रविवार, ३१ ऑक्टोबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक १०४
www.ramprahar.com

# रामप्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

पीओपी गणेशमूर्तींवरील बंदी उठवण्याची मागणी/२
अर्थविषयक घडामोडींचा वेध घेणारे सदर अर्थ प्रहर/४
वर्ल्डकपमध्ये आज भारत वि. न्यूझीलंड लढत/६

## राज्य सेवा पूर्व परीक्षा अर्जासाठी मुदतवाढ

**मुंबई** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) राज्य सेवा पूर्व परीक्षा २०२१साठी अर्ज सादर करण्याच्या मुदतीत वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे आता अर्ज भरण्याची नवी अंतिम तारीख २ नोव्हेंबर असणार आहे. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्यसेवा पूर्व परीक्षेची जाहिरात प्रसिद्ध केली होती. त्यामध्ये पूर्व परीक्षा २ जानेवारी २०२२ रोजी व मुख्य परीक्षा दिनांक ७, ८ व ९ मे, २०२२ रोजी आयोजित करण्यात येईल, अशी माहिती दिली होती. वैश्विक महामारी कोरोनामुळे सलग दोन वर्षे परीक्षा झाल्या नव्हता, तर कोरोनाचा प्रादूर्भाव कमी होऊ लागल्यानंतर ऑनलाइन शिक्षण आणि परीक्षा पुन्हा सुरू झाल्या. त्यानंतर आता हळूहळू परीक्षांचे वेळापत्रक पूर्ववत होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## ठाकरे सरकारकडून शेतकऱ्यांना अल्प मदत

# भाजप उद्या करणार आंदोलन

**मुंबई : प्रतिनिधी**

अतिवृष्टी, पूर आणि वादळामुळे नुकसान सोसावे लागणाऱ्या शेतकऱ्यांना ठाकरे सरकारने अल्प मदत केली आहे. त्याच्या निषेधार्थ येत्या १ नोव्हेंबर रोजी भाजपचे एक लाख कार्यकर्ते काळ्या फिती लावून आंदोलन करणार आहेत. भाजपचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी शनिवारी (दि. ३०) पत्रकार परिषद घेऊन या आंदोलनाची घोषणा केली.

राज्यात गेल्या दोन वर्षांपासून वादळे, अतिवृष्टी, नापिकीमुळे भरडल्या गेलेल्या शेतकऱ्यांच्या हातात सरकारी मदतीचा एक पैसादेखील पडलेला नाही. या सरकारने राज्यातील शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. शेतकऱ्यांच्या या संतापात सहभागी होऊन त्यांच्या व्यथांना वाचा फोडण्यासाठी हे आंदोलन असेल, अशी माहिती उपाध्ये यांनी दिली.

ठाकरे सरकार सत्तेवर आल्यानंतर काही महिन्यांतच राज्यात निसर्ग वादळामुळे वाताहत झाली. हजारो शेतकरी कुटुंबे उद्ध्वस्त झाली आणि पुढील किमान १० वर्षे पुन्हा उभे राहता येणार नाही अशी अपरिमित हानी झाली. या शेतकऱ्यांकरिता ठाकरे सरकारने मदतीची जोरदार घोषणाबाजी केली, मात्र त्या मदतीचा पैसा वर्षानंतरही शेतकऱ्यांपर्यंत पोहचला नव्हता, हे मुख्यमंत्र्यांच्याच दौऱ्यात स्पष्ट झाले. (पान २ वर..)

### पैसा कुणाकडे पोहचला?

*सेलिब्रिटींच्या बचावासाठी राज्य सरकारमधील मंत्र्यांची कारकिर्द पणाला लावून त्यांच्यासाठी कामे बाजूला ठेवून किल्ला लढविणाऱ्या सरकारला शेतकऱ्यांचा आक्रोश दिसत नाही का, असा सवाल करून उपाध्ये म्हणाले की, १३ ऑक्टोबरला ठाकरे सरकारने शेतकऱ्यांसाठी १० हजार कोटींच्या मदतीचा गाजावाजा केला, मात्र अद्याप त्यापैकी एक पैसाही शेतकऱ्यापर्यंत पोहचलेला नाही. केवळ संकटग्रस्त भागांचे दौरे करणे आणि मदतीच्या घोषणा करणे यात काही अर्थ नाही, असे खुद्द मुख्यमंत्रीच म्हणाले होते. त्यांना आपल्या या वाक्याची आठवण असेल व थोडीशी जरी लाज असेल तर त्यांनी शेतकऱ्यांना जाहीर केलेल्या मदतीमधून किती शेतकऱ्यांना लाभ झाला, कोणाकडे पैसा पोहचला याचा संपूर्ण राज्याचा तपशील जनतेसमोर उघड करावा.*



# आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नाने कोन-सावळा रस्त्याची डागडुजी सुरू

## ■ श्रेय लाटण्यासाठी शेकापकडून आंदोलनाची नौटंकी

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

दयनीय अवस्था झालेल्या कोन-सावळा रस्त्यावरील खड्डे भरण्यास आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नाने दोन दिवसांपूर्वी सुरुवात झालेली आहे, मात्र याचे श्रेय त्यांना मिळेल या भीतीने पछाडलेल्या शेतकरी कामगार पक्षाने शनिवारी (दि. ३०) आंदोलनाची नौटंकी केली.

कोन-सावळा रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. या रस्त्याकरिता उरण विधानसभा मतदारसंघाचे कार्यतत्पर आमदार महेश बालदी यांच्या विशेष प्रयत्नाने सार्वजनिक विभागाकडून पाच कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या कामाची निविदा प्रक्रिया निघाली असून एक महिन्याच्या आत काम सुरू होणार आहे.

याशिवाय कोन-सावळा रस्त्याकरिता केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी केंद्रीय रस्ते विकास निधी अंतर्गत १५ कोटी रुपये मंजूर केले आहेत. या कामाला तांत्रिक मान्यता मिळाली असून दोन महिन्यांच्या आत काम सुरू होणार आहे.

वास्तविक, कोन-सावळा रस्त्याच्या प्रस्तावित कामांना महाविकास आघाडी सरकारच्या ढिसाळ कारभारामुळे एक-दोन महिने उशीर होणार असल्याने आमदार महेश बालदी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागास तातडीने खड्डे भरण्यास सांगितले व त्यानुसार या कामास सुरुवातदेखील झालेली आहे. त्यानंतर जाग आलेल्या शेकापने शनिवारी आंदोलनाचा स्टंट केला.

खरेतर शेकाप म्हणजे महाविकास आघाडी सरकारचा एक भाग आहे. मग त्यांनी या रस्त्यासाठी का निधी मंजूर करून घेतला नाही, असा सवाल उपस्थित होतो. त्याचप्रमाणे शेकापला जर आंदोलन करायचेच असेल तर त्यांनी आधी कर्नाळा बँक खातेदारांची समस्या सोडवण्यासाठी करावे, अशी भावना जनमानसात आहे.

उरण विधानसभा मतदारसंघातील समस्या सोडवण्यासाठी आमदार महेश बालदी खंबीर आहेत. त्यांच्याच प्रयत्न व पाठपुराव्यातून कोन-सावळा रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम लवकरच सुरू होऊन पूर्ण होईल, असा ठाम विश्वास नागरिकांमध्ये आहे.



पनवेल : ३२व्या महाराष्ट्र राज्य वरिष्ठ गट तलवारबाजी स्पर्धेत पनवेलच्या निमिषा थवई हिने कांस्यपदक पटकाविले. कोल्हापूर येथे झालेल्या या स्पर्धेत १५ वर्षीय निमिषाने खुल्या गटात फॉइल प्रकारात ही कामगिरी केली. त्याबद्दल भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी निमिषाचे कौतुक करून सत्कार केला आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी पालक, प्रशिक्षक मिलिंद ठाकूर, वैभव पेटकर उपस्थित होते.

## वरळीतील मच्छीमारांनी कोस्टल रोडचे काम बंद पाडले

### ■ आदित्य ठाकरेंवर जोरदार टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना आणि मुंबई महापालिकेच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या कोस्टल रोडच्या प्रकल्पाला वरळीतील मच्छीमारांनी विरोध दर्शविला आहे. स्थानिकांनी शनिवारी (दि. ३०) राज्याचे पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांच्यावर टीका करीत कोस्टल रोडचे काम बंद पाडले.



कोस्टल रोड प्राधिकरणाने समुद्रात मासेमारी करण्याच्या ठिकाणी बार्जेस नांगरून ठेवल्यामुळे मच्छिमारांना मासेमारीस अडचण येत आहे तसेच या बार्जेस समुद्रात नांगरून ठेवल्याने मच्छिमारांच्या जाळ्यांचे फार मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे संतप्त स्थानिकांनी शनिवारी भर समुद्रात काम सुरू असलेल्या बार्जवर जाऊन ते बंद पाडले. (पान २ वर..)

## निवडक

### पंतप्रधान मोदींनी घेतली पोपची भेट

**व्हॅटिकन सिटी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ख्रिश्चन धर्माचे सर्वोच्च धर्मगुरू पोप फ्रान्सिस यांची व्हॅटिकन सिटी येथे शनिवारी (दि. ३०) भेट घेतली. सूत्रांच्या माहितीनुसार ही बैठक केवळ २० मिनिटांची होती, मात्र तासभर चालली. या वेळी पंतप्रधान मोदींनी पोप फ्रान्सिस यांना भारत भेटीचे निमंत्रण दिले. यापूर्वी शेवटची पोपची भारत भेट सन १९९९मध्ये झाली होती. तेव्हा अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान होते आणि पोप जॉन पॉल-२ भारत भेटीवर आले होते.

### ज्येष्ठ अभिनेते युसूफ हुसैन यांचे निधन

**मुंबई** : बॉलीवूडमधील ज्येष्ठ अभिनेते युसूफ हुसैन यांचे निधन झाले आहे. प्रसिद्ध दिग्दर्शक हंसल मेहता यांनी सोशल मीडियावर हुसैन यांच्या निधनाची बातमी दिली. हुसैन यांनी अनेक चित्रपट, मालिकांत काम केले आहे. 'दिल चाहता है', 'ओह माय गॉड', 'दबंग ३', 'धूम' यांसारख्या चित्रपटात त्यांनी भूमिका साकारली. त्यांच्या निधनामुळे बॉलीवूडमध्ये हळहळ व्यक्त केली जातेय.

### द. आफ्रिकेचा लंकेवर रोमहर्षक विजय

**शारजा** : अखेरच्या षटकात डेव्हिड मिलरने फटकेबाजी करून टी-२० विश्वचषक स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेला श्रीलंकेविरुद्ध विजय मिळवून दिला. लंकेने प्रथम फलंदाजी करीत २० षटकांत १४२ धावा केल्या होत्या.

## नेरे येथे रस्ता काँक्रिटीकरणाचे भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल विधानसभा मतदारसंघात विकासाची अनेक कामे सुरू आहेत. त्या अंतर्गत नेरे येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक विकास निधीमधून रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात येत आहे. या कामाचे भूमिपूजन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शनिवारी (दि. ३०) झाले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक विकास निधीमधून नेरे येथील सरकारी हॉस्पिटल ते तेजस जाधव यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात येत आहे. त्याच्या भूमिपूजन कार्यक्रमास पं. स. सदस्य राज पाटील, नेरे ग्रामपंचायतीच्या सरपंच राजश्री म्हस्कर, माजी सरपंच वासुदेव गवते, ग्रामपंचायत सदस्य प्रकाश घाडगे, वर्षा पाटील, एकनाथ पाटील, गोपीनाथ पाटील, निलेश पाटील, राम पाटील, कृष्णा मगर, गजानन पाटील, दीपक पाटील, मंगेश जाधव, सुनील गायकवाड, युवा मोर्चा नेरे जि. प. अध्यक्ष सागर पाटील, हर्षल पाटील, सुनील दौंड, शैलेश बंगलेकर, आनंद यादव, प्रीती आढाव, सुधा पाटील, विश्वास भोसले यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



## अखेर आर्यन खानची सुटका

**मुंबई** : बॉलीवूड अभिनेता शाहरूख खानचा मुलगा आर्यन अखेर २६ दिवसांच्या प्रतीक्षेनंतर शनिवारी (दि. ३०) अखेर तुरूंगाबाहेर आला. मुंबई उच्च न्यायालयाने त्याला जामीन मंजूर केला असून आर्यनच्या जामिनासाठी शाहरूखची मैत्रीण व अभिनेत्री जुही चावला ही जामीनदार आहे. एक लाखांच्या जातमुचलक्यावर आर्यनची जामिनावर सुटका झाली.

आर्यनच्या जामिनासाठी मुंबई उच्च न्यायालयाने १४ अटी घातल्या आहेत. आर्यन हा पोलिसांना कळवल्याशिवाय मुंबई सोडू शकणार नाही. त्याला दर शुक्रवारी एनसीबीसमोर हजर राहावे लागेल, असे या अटींमध्ये नमूद करण्यात आले आहे. त्याचबरोबर त्याला त्याचा पासपोर्ट जमा करावा लागणार आहे.






# पीओपी गणेशमूर्तींवरील बंदी उठवावी

## ▪ शिष्टमंडळाचे केंद्रीय पर्यावरणमंत्र्यांना साकडे

**पेण : प्रतिनिधी**

प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी)च्या गणेशमूर्तींवरील बंदी उठवावी, अशी मागणी भाजप नेते आणि पेणमधील गणेशमूर्तिकारांच्या शिष्टमंडळाने केंद्रीय पर्यावरणमंत्री भूपेंद्र यादव यांची दिल्लीत भेट घेऊन केली आहे.

या शिष्टमंडळात उरणचे आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्यासह गणेशमूर्तिकार संघटनेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अभय म्हात्रे, सचिव प्रवीण बांधणकर, हमरापूर विभाग संघटनेचे अध्यक्ष गोपीनाथ मोकल, सचिव राजन पाटील, खजिनदार रोशन नाईक, सदस्य जयेश पाटील, बल्लाळ पाटील, कैलास पाटील, सचिन पाटील, भगवान पाटील, कुणाल पाटील, रवी मोकल, संतोष मोकल, रूपेश पाटील, अरविंद पाटील, अमोल कुंभार, कैलाश पाटील आदी कारखानदारांचा समावेश होता.



रायगड जिल्ह्यातील सात ते दहा हजार आणि महाराष्ट्रातील १० ते १५ लाख लोक मूर्ती उद्योगावर अवलंबून आहेत. पीओपीच्या गणेशमूर्तींमुळे पर्यावरणावर कोणताही परिणाम होत नसल्याचा निष्कर्ष समितीने नेमलेल्या शास्त्रज्ञांनी काढला आहे. त्यामुळे पीओपी मूर्तींवर बंदी आणू नये, असे साकडे मूर्तिकारांनी केंद्रीय पर्यावरणमंत्री भूपेंद्र यादव यांना घातले. मूर्तींना देण्यात येणाऱ्या रंगामुळे प्रदूषण होते असे पर्यावरण खात्याचे म्हणणे आहे. तसे असेल तर पर्यावरण खाते सांगेल ते रंग वापरण्यास मूर्ती कारखानदार तयार आहेत, असेही कारागिरांनी या वेळी सांगितले. यावर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन पर्यावरणमंत्री यादव यांनी दिले.



पनवेल : महापालिकेच्या वतीने आणि नगरसेविका दर्शना भोईर यांच्या प्रयत्नांमुळे बस स्टँड येथे कंटेनर टॉयलेट उभारण्यात येत आहे. या कामाचे भूमिपूजन नगरसेवक अनिल भगत यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. या वेळी चंद्रकांत मंजुळे, राजू कोळी, लखन जाधव, प्रदीप रणदिवे आदी उपस्थित होते.



पनवेल : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा व समर्पण अभियानांतर्गत अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. त्या अनुषंगाने शहरातील प्रभाग १९ मधील सावरकर चौक येथील आदर्श नारी महिला बचत गटाच्या रास्त भाव धान्य दुकानावर रेशन घेणाऱ्या लाभार्थ्यांना नगरसेविका रूचिता लोंढे यांच्यामार्फत उत्तम दर्जाच्या पिशव्यांचे शनिवारी मोफत वाटप करण्यात आले. या वेळी युवा मोर्चाचे चिन्मय समेळ, प्रीती धोपाटे, अक्षता नेहीते, तन्मय समेळ, ओम करमळकर, अजिंक्य भिडे आदी उपस्थित होते.



उरण : खोपटे ग्रामपंचायतीच्या सरपंच विशाखा ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त भाजप उरण विभाग अध्यक्ष शशिकांत पाटील, ग्रामपंचायत सदस्य अच्युत ठाकूर, भाजप तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांनी शुभेच्छा दिल्या.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयातर्फे गरजूंना दिवाळी फराळ, कपडे वाटप

**खारघर : रामप्रहर वृत्त**

दिवाळी या सणानिमित्त आदिवासी पाड्यातील लोकांबरोबर काही आनंदाचे क्षण वाटण्याच्या दृष्टीने जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने दिवाळी फराळ व कपडे वाटप उपक्रम शनिवारी (दि. ३०) खारघरच्या घोळवाडी येथे राबविण्यात आले.



या उपक्रमाचे उद्घाटन प्रभारी प्राचार्य डॉ. निलेश कोळी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी आयक्यूएसीचे समन्वयक प्रा. महेश्वरी झिरपे, एनएसएस विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रवीण सावे, डिएलएलई विभागप्रमुख प्रा. महेश धायगुडे, प्रा. रोहित पाटील, एनएसएस स्वयंसेवक आणि डिएलएलई स्वयंसेवक उपस्थित होते.

या उपक्रमातून आदिवासी पाड्यातील लोकांबरोबर विद्यार्थ्यांचा संवाद वाढविण्याचा प्रयत्न केला गेला. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. भरत सोलंकी यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी महत्त्वपुर्ण योगदान दिले. महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थीनींनी या उपक्रमात सहभागी होऊन घोळवाडी येथील आदिवासी लोकांना दिवाळी फराळ व कपडे वाटप करून मदत केली.

या उपक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिध्देश्वर गडदे यांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले.

# माणगावातील ज्वेलर्स दुकानातून ऐवज चोरला

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील इंदापूर येथील बालाजी ज्वेलर्सचे दुकान अज्ञात चोरट्यांने फोडून दुकानांच्या आत प्रवेश करून सोन्या चांदीचे दागिने सुमारे चार लाख ५८ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरले. याबाबतची सोहनलाल बुराराम चौधरी (वय ४२, रा. इंदापूर, ता. माणगाव) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.




चोरट्याने चौधरी यांचे इंदापूरातील बंद ज्वेलर्स दुकानाचा लोखंडी सिलिंग लॉक व सेंटर लॉक कोणत्यातरी हत्याराच्या सहाय्याने तोडून दुकानाच्या आत प्रवेश केला. त्याने दुकानातील सोन्या-चांदीचे दागिने, सॅमसंग कंपनीचा एलसीडी टिव्ही, एक सीसीटीव्ही डीव्हीआर असा एकुण चार लाख ५८ हजार पाचशे रुपये किमतीचा ऐवज चोरला. माणगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस नाईक जाधव या करीत आहेत.

# दिवाळीनिमित्त कमी दरात फराळाचे सामान

## नवीन पनवेलमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उपक्रमाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवाळी सणानिमित्त भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्षाच्या वतीने दिवाळी फराळाचे सामान बाजारभावापेक्षा कमी दरात उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्याअंतर्गत नवीन पनवेल येथे स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी यांच्या जनसंपर्क कार्यालयात या सामानाची विक्री करण्यात येत असून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते या उपक्रमाचेही शुक्रवारी (दि. २९) उद्घाटन झाले. या वेळी भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत उपस्थित होते.



माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व नागरिकांची दिवाळी गोड व्हावी या उद्देशाने भाजपच्या वतीने दिवाळी फराळाचे समान बाजार भावापेक्षा कमी दरात उपलब्ध करून देण्यात आले आहे.

या समानामध्ये रवा, मैदा, चणाडाळ, साखर, पोहे, गुळ, डालडा आणि गोडेतेल आदी वस्तूंचा समावेश आहे. त्यानुसार नवीन पनवेल येथे स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी यांच्या जनसंपर्क कार्यालयात या समानाची विक्री करण्यात येत आहे.

या उपक्रमाच्या उद्घाटनाच्या वेळी भाजपचे शहर अध्यक्ष जयंत पगडे, महापालिकेच्या महापौर डॉ कविता चौतमोल, प्रभाग समिती 'ब'चे सभापती समीर ठाकूर, स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, नगरसेवक तेजस कांडपिळे, नगरसेविका राजेश्री वावेकर, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पनवेल पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, शिवाजी भगत, राजेश पाटील, भगवान बडगुजर, डीएस शेट्टी, रोहित घरत, माजी उपसरपंच अक्षय सिंग, जितेंद्र तिवारी, दशरथ चेऊलकर, दर्शना जाधव, टीआयपीएलचे कार्यकारी संचालक धनंजय करतुरी, रिमा रावन यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी, भाजपच्या वतीने प्रथमच अशा पद्धतीचा कार्यक्रम राबविण्यात येत असल्याचे सांगून हा उपक्रम यशस्वी होत आहे, असा विश्वास व्यक्त केला.

पान १ वरून

## भाजप उद्या करणार आंदोलन

मदत का मिळाली नाही याची माहिती घेतो, असे बोलघेवडे आश्वासन देऊन मुख्यमंत्री ठाकरे मुंबईत परतले, मात्र मंत्रालयाकडे फिरकलेच नाहीत. त्यामुळे मदतीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यास न्याय मिळालाच नाही, असा दावा उपाध्ये यांनी या वेळी केला.

महाराष्ट्रात गेल्या अनेक महिन्यांपासून महिलांवर बलात्कार, अत्याचाराचे गुन्हे घडत आहेत. महिलांना न्याय देण्यासाठी राज्य सरकारने वेळोवेळी केलेल्या घोषणांचे काय झाले? कोणत्या उपाययोजना अमलात आल्या? आणि किती गुन्हेगारांना कोणत्या शिक्षा झाल्या? हेदेखील जाहीर करण्याची हिंमत ठाकरे सरकारने दाखवावी, असे आव्हान उपाध्ये यांनी दिले.

गेल्या दोन वर्षांत खंडणी वसुली आणि टक्केवारीपलीकडे जनहिताची कोणतीही योजना न आखणाऱ्या निष्क्रिय सरकारच्या निषेधार्थ काळ्या फिती लावून आंदोलन करण्यात येईल. भाजप कार्यकर्ते जागोजागी सरकारला जाब विचारतील. काळ्या कारभाराचे वाभाडे काढून जनतेसमोर सरकारचे स्वार्थी रूप उघड करतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## वरळीतील मच्छीमारांनी कोस्टल रोडचे काम बंद पाडले

या वेळी मच्छीमारांनी राज्याचे पर्यावरणमंत्री आणि स्थानिक आमदार आदित्य ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. आदित्य ठाकरे पर्यावरण मंत्री आहेत, पण त्यांना पर्यावरणाचे काही माहिती आहे का? आमच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे. आम्हाला कोण एक दिवस पाहायला येत नाही. निवडून येतात आमच्या इथून आणि मदत दुसरीकडे करतात. असे कसे चालेल? आम्ही आमच्या कुटुंबातील सर्वांना घेऊन येतो. तुम्ही तुमचा प्रकल्प करा आणि आम्हाला मारून टाका, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिकांनी दिली.

याआधी मच्छिमारांनी समतोल भूमिका घेत याबाबत स्थानिक नेत्यांसोबत चर्चा केली होती, मात्र त्याचा काहीही उपयोग झाला नसल्याने आता मच्छिमारांनी तीव्र भूमिका घेतली आहे. जोपर्यंत मच्छिमारांच्या मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत कोस्टल रोडचे काम बंद करण्याची भूमिका स्थानिकांनी घेतली आहे. या आंदोलनामुळे वरळी कोळीवाड्यात वातावरण चिघळले होते. या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात पोलीस दल आणि आरसीएफ पथक तैनात करण्यात आले होते.





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
रविवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२१ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस
(वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर

सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.

६. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
७. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
८. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
९. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
१०. रोटरी क्लब, नवीन पनवेल
११. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
१२. न्यू इंग्लिश स्कुल, कळंबोली

कोवॅक्सिन

१. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली


प्रो. जमा ६-२५

मा. गोडसे सो
अर्जदाराचे वकील
**सत्यश्री महादेव गायकर**
वकील उच्च न्यायालय

### जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) यांचे कोर्टात**

दि. चौ. अर्ज १५४३/२०२१
निशाणी नं. ८ड
ने. ता. १६/१२/२०२१

**१) श्रीमती चंद्राबाई त्रिंबक खारकर** } अर्जदार
वय ७१ वर्षे, धंदा- गृहिणी
**२) श्री. अनंत त्रिंबक खारकर**
वय ५३ वर्षे, धंदा-
**३) कै. विनोद त्रिंबक खारकर**
(मयत तर्फे वारस)
**३/१) श्रीमती गुलाब विनोद खारकर**
वय ४० वर्षे, धंदा- गृहिणी
**३/२) सौ. सायली सुरज ठाकूर**
**पूर्वाश्रमीची कु. सायली विनोद खारकर**
वय २१ वर्षे, धंदा- गृहिणी
रा. उलवे, ता. पनवेल, जि. रायगड
**३/३) सौ. श्वेता विशाल पाटील**
**पूर्वाश्रमीची कु. श्वेता विनोद खारकर**
वय २० वर्षे, धंदा- गृहिणी
रा. दहिवली, ता. पनवेल, जि. रायगड
**३/४) कु. साक्षी विनोद खारकर**
वय १८ वर्षे, धंदा-
**३/५) कु. सृष्टी विनोद खारकर**
अर्जदार क्र. ३/१ स्वत:करीता व
अ.पा.क. म्हणून आई
अर्जदार क्र. ३/५ करीता
अर्जदार क्र. १ ते ३/१, ३/४, ३/५
रा. उलवे, ता. पनवेल, जि. रायगड
**४) श्री. सिकंदर त्रिंबक खारकर**
वय ४१ वर्षे, धंदा- नोकरी
रा. उलवे, ता. पनवेल, जि. रायगड
**५) सौ. सरिता गणेश गवते**
वय ५० वर्षे, धंदा- गृहिणी
रा. नेरे, ता. पनवेल, जि. रायगड
**६) कै. बाबुराव त्रिंबक खारकर**
(मयततर्फे वारस)
**६/१) श्रीम. सुरेखा बाबुराव खारकर**
वय ५३ वर्षे, धंदा- गृहिणी
**६/२) कु. साहिल बाबुराव खारकर**
वय २० वर्षे, धंदा-
अर्जदार क्र. ६/१ व ६/२ व ६/४
रा. उलवे, ता. पनवेल, जि. रायगड
**६/३) सौ. स्वप्नाली प्रवीण म्हात्रे**
**पूर्वाश्रमीची कु. स्वप्नाली बाबुराव खारकर**
वय २५ वर्षे, धंदा- गृहिणी
रा. पिसार्वे, ता. पनवेल, जि. रायगड
**६/४) श्रीमती निशा बाबुराव खारकर**
वय ३१ वर्षे, धंदा- गृहिणी
**६/५) सौ. अनिशा अशोक पाटील**
**पूर्वाश्रमीची कु. अनिशा बाबुराव खारकर**
वय ३२ वर्षे, धंदा- गृहिणी
रा. बेलापूर-नवी मुंबई
**६/६) सौ. सोनाली विश्वास म्हात्रे**
**पूर्वाश्रमीची कु. सोनाली बाबुराव खारकर**
वय २९ वर्षे, धंदा- गृहिणी
रा. कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड

**विरुद्ध**

**कोणीही नाही** } **सामनेवाला**

ज्याअर्थी **कै. त्रिंबक नारायण खारकर** रा. उलवे, ता. पनवेल, जि. रायगड हे दिनांक ०४/०६/२०१८ रोजी मौजे उलवे, ता. पनवेल, जि. रायगड येथे मयत झाले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-उलवे, ता. पनवेल, जि. रायगड.**

| भूमी संपादन निवाडा क्र. | सर्वेक्षणानुसार बांधकाम क्रमांक | बांधकामाचे/ संपादीत जमिनीचे क्षेत्र (चौ.मी.) | बांधकामाचा वापर | निवाड्यानुसार भूखंड वाटपाची पात्रता ठरविण्यास अनुज्ञेय क्षेत्र (चौ.मी.) | भूखंड वाटपाचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | भूखंड वाटपाचे स्थळ | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
| ULV-ICIG-260 | UL-523 UL-523A | ७५.३२ | निवासी | ६९.३१ | उलवे (उपरोक्त प्रमाणे) | २४ | २२१ | २१०.०० |

**कै. त्रिंबक नारायण खारकर** यांस अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत. सबब अर्जदार सदरचा अर्ज करीत आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाही असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

तारीख **२९/१०/२०२१** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**ठिकाण - पनवेल**
**दिनांक - २९/१०/२०२१**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**क. लिपिक**
**दिवाणी न्यायाधिश (व. स्तर) पनवेल**

**सही/-**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायाधिश (व. स्तर) पनवेल**

## निवडक

### लाचप्रकरणी दोन पोलिसांवर गुन्हा

**पनवेल :** अमली पदार्थविरोधी पथकातील आणखी पोलीस कर्मचाऱ्यांनी पान मसाला विक्रेत्याकडे गुटखा व पान मसाल्याचा धंदा सुरू ठेवण्यासाठी दरमहा १५ हजार रुपये लाचेची मागणी केल्याचे उघडकिस आले आहे. त्यामुळे लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने या दोन पोलीस कर्मचाऱ्यांविरोधात लाचेची मागणी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत गुन्हा दाखल करण्यात आलेल्यामध्ये पोलीस शिपाई बाबासाब मधु सांगोलकर व पोलीस हवालदार इक्बाल बशिर शेख या दोघांचा समावेश असून हे दोघेही नवी मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकात कार्यरत आहेत. या प्रकरणातील तक्रारदार मोहम्मद फैज निजामुद्दीन सय्यद हा सीवूड्समध्ये रहाण्यास असून त्याचा पान मसाला व गुटखा विक्रीचा व्यवसाय आहे.

### दिवाळीनिमित्त गडकिल्ले स्पर्धा

**उरण :** दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर उरण तालुक्यातील शिवप्रेमी युवा प्रतिष्ठान धाकटेभोम-चिरनेर या सामाजिक संस्थेतर्फे गड किल्ले स्पर्धाचे आयोजन करण्यात आले असून ही स्पर्धा धाकटे भोम व भोम गावासाठी मर्यादित आहेत. स्पर्धेचे नियम व अटी याबाबत अधिक माहितीसाठी व स्पर्धेत सहभागी होण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी करण नारंगीकर (७७१०९२२७९२), प्रशांत पाटील (९९३०६६०४३३), शेखर नारंगीकर (९६६४२५५४०१) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

### नवी मुंबई विभागाचे पोस्ट स्थलांतरित

**नवी मुंबई :** मुख्य पोस्ट ऑफीस पनवेल परिसरातील नवी मुंबई विभागाचे वरिष्ठ अधीक्षक पोस्ट ऑफीस कार्यालय वाशी येथे स्थलांतरीत झाल्याबाबतची माहिती वरिष्ठ अधीक्षक पोस्ट ऑफीस नवी मुंबई विभाग यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये कळविली आहे. पनवेल परिसरातील मुख्य पोस्ट ऑफिस इमारतीत असलेले नवी मुंबई विभागाचे वरिष्ठ अधीक्षक पोस्ट ऑफीस कार्यालय, नवी मुंबई विभाग, एमडीजी बिल्डिंग, तळमजला, हिंदुराव पाटील मार्ग, सेक्टर-१६ए, प्लॉट क्रमांक १८, एमटीएनएल कार्यालयासमोर, वाशी-४०० ७०३ या नवीन पत्त्यावर २० ऑक्टोबरपासून स्थलांतरीत करण्यात आले आहे. या नवीन कार्यालयाचा दूरध्वनी क्र.०२२२७६६६६६५ असा आहे, असे आवाहन वरिष्ठ अधीक्षक पोस्ट ऑफीस कार्यालय वाशी, नवी मुंबई यांनी केले आहे.

### वळवलीत महिलेचा मृतदेह आढळला

**पनवेल :** एका अनोळखी महिलेचा मृतदेह तालुक्यातील वळवली गावाच्या हद्दीतील बाहेरच्या बाजूस वडाच्या झाडाखाली आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या महिलेचे अंदाजे वय ६० वर्षे, उंची पाच फूट, रंग काळा सावळा, अंगाने मध्यम, चेहरा उभट असून, अंगावर गुलाबी साडी व दोन्ही हातामध्ये हिरव्या बांगड्या आहेत. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास खांदेश्वर पोलीस ठाणे दूरध्वनी ७२१९१७३६०० किंवा पोलीस उपनिरीक्षक निलम जाधव यांच्याशी संपर्क साधावा.

### वडघर येथून दुचाकीची चोरी

**पनवेल :** वडघर बौद्ध विहारजवळ उभी करून ठेवलेली ५० हजार रुपये किमतीची स्कूटर अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. राजेश मोरे यांची ५० हजार रुपये किमतीची टीव्हीएस बीएस व्हीआय स्कूटर (एमएच-०६-सीई-५५३९) ही त्यांनी कँटिंगच्या बाहेर रस्त्यावर उभी करून ठेवली होती. या वेळी अज्ञात चोरट्यांनी ही स्कूटर चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पनवेलमध्ये एकाची फसवणूक

**पनवेल :** फेसबुकवर इंपोर्ट एक्स्पोर्ट संबंधित ग्रुपवर एका व्यक्तीने आमिष दाखवून फसवणूक केल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अमित माने यांची फेसबुकवर इंपोर्ट एक्स्पोर्ट संबंधित ग्रुपवर अज्ञात व्यक्ती संतोष पवार यांची ओळख झाली. त्यांच्याशी संपर्क साधला असता त्याने सांगितल्याप्रमाणे २९ टन कांदा हा दुबईला पाठवायचा आहे व त्या मोबदल्यात तुम्हाला चार लाख ७५ हजार रुपये मिळतील असे आमिष दाखविले, परंतु आतापर्यंत टेलिग्राफीक ट्रान्सफर परत न करता त्याची खोटी पावती पाठवून त्या व्यक्तीने त्यांची फसवणूक केल्याने याबाबतची तक्रार त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.

## कामोठ्यातील संतापजनक घटना

# डॉक्टरकडून बाळाची विक्री

**पनवेल : वार्ताहर**

लहान बाळाची चार लाखांत विक्री करणाऱ्या डॉक्टरला कामोठे पोलिसांनी शुक्रवारी (दि. २९) कामोठे वसाहतीमधून रंगेहात अटक केले आहे. त्यासोबत बाळाला विक्रीसाठी घेऊन आलेल्या महिलांनादेखील पोलिसांनी अटक केले आहे. ही घटना कामोठे वसाहतीमधील असून डॉक्टरचे या वसाहतीमध्ये स्वतःचे क्लीनिक आहे.



डॉ. पंकज गोपाळराव पाटील (वय ५३ वर्ष राहणार कामोठे) हे आरोपी डॉक्टरचे नाव आहे. पंकज पाटील यांनी स्त्री जातीच्या लहान बाळाचा सौदा करून चार लाखाला त्याची विक्री केली होती. सध्या हा डॉक्टर कामोठे पोलिसांच्या ताब्यात आहे. कामोठे सेक्टर ८ मधील फॅमेली हेल्थ केअर नावाने दवाखाना चालवणारा डॉक्टर एका लहान बाळाची चार लाखाला विक्री करणार असल्याची माहिती, कामोठे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महाला यांना मिळाली होती. त्यानुसार, महाला यांनी या डॉक्टरला अटक करण्यासाठी सापळा रचून पोलीस नाईक मंथन पाटील यांच्या मदतीने खाजगी पंच आणि खबर देणारा व्यक्ती बाळाची खरेदी करण्यासाठी स्वतः पंकज पाटील यांच्या दवाखान्यात गेल्या.

या वेळी डॉक्टर पाटील यांनी सांगितलेल्या चार लाखाची रक्कमदेखील सोबत घेऊन गेल्या. या चार लाखात पोलिसांनी काही बनावट नोटा लावून चार लाखाची रक्कम जमा करून ते सोबत गेले. या वेळी डॉक्टरसोबत जाऊन पैसे दाखवून बाळाची विचारणा केली, त्या वेळेस डॉक्टरने रक्कम पाहून बाळाला विकणाऱ्या महिलेला फोन केला आणि क्लीनिकमध्ये येण्यास सांगितले. त्या नुसार तळोजामध्ये राहणाऱ्या तीन महिला अवघ्या १० मिनिटात स्त्री जातीच्या लहान बाळाला घेऊन त्या क्लीनिकमध्ये आल्या आणि ठरलेल्या व्यवहारानुसार डॉ. पंकज पाटील यांनी पैसे घेतले आणि बाळा त्याच्या स्वाधीन केले.

या वेळी विक्रीसाठी आलेल्या महिला बाळाला देऊन बाहेर पडल्या. त्याचवेळी क्लीनिक च्या बाहेर दबा धरून बसलेल्या पोलीस निरीक्षक महाला यांच्या पथकांने महिलांना व डॉक्टरला अटक केली. डॉक्टरने घेतलेली रक्कमदेखील ताब्यात घेण्यात आली. या प्रकरणामुळे डॉक्टर वर्गात खळबळ माजली आहे. सध्या कामोठे पोलीस या घटनेचा तपास करत असून, डॉक्टरकडून अधिक माहिती गोळा करीत आहे.

## नवी मुंबई महापालिका मुख्यालयात येणाऱ्या अभ्यागतांसाठी नियमावली

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिकेच्या मुख्यालयात येणाऱ्या अभ्यागतांना भेटण्याच्या वेळांत प्रशासनाने बदल केले आहेत. नव्या नियमाप्रमाणे दुपारी ३ ते ६ या वेळांत भेटता येणार आहे. याची गुरुवारपासून अंमलबजावणी सुरू झाली, मात्र नागरिकांनी याला विरोध दर्शवला.

नवी मुंबई महापालिकेने दोन दिवसांपूर्वी कोरोना आणि सुरक्षिततेकरिता नवीन नियमावली जाहीर केली आहे. त्यात महापालिका मुख्यालयासाठीही नियमावली करण्यात आली आहे. मुख्यालयात याआधी कोणीही येऊन आंदोलने, निदर्शने करीत होते, याचा त्रास प्रशासनाला होत असे. यामुळे नवी नियमावली करण्यात आली आहे, मात्र



**मुख्यालयात कोणीही कोणत्याही वेळी येत असते. त्यामुळे अधिकारी, कर्मचारी यांच्या कामावर परिणाम होतो. कामे रेंगाळत होती, तसेच कोरोनाच्या अनुषंगानेही गर्दी होऊ नये म्हणून नवीन नियमावली तयार करण्यात आली आहे.**
**-संध्या अंबादे, उपायुक्त, आपत्ती व्यवस्थापन व सुरक्षा विभाग**

गुरुवारी पहिल्याच दिवशी सकाळी प्रवेशद्वारावर आलेल्या नागरिकांना सुरक्षा रक्षकांनी अडवले. त्यामुळे सुरक्षा रक्षक व नागरिक व ठेकेदार यांच्यात वाद झाले. त्यामुळे तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. या वेळी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांनी मध्यस्थी करून नागरिकांना शांत करीत त्यांना प्रवेश देण्यात आला.

## खोपटे येथे शाळा इमारतीचा आज भूमिपूजन सोहळा

**उरण : वार्ताहर**

रायगड जिल्हा परिषदेच्या उरण तालुक्यातील खोपटे येथील प्राथमिक शाळेच्या नवीन इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. ३१) सकाळी १०.३० वाजता होणार आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून आमदार महेश बालदी, न्हावा-शेवा टर्मिनल पोर्टचे डायरेक्टर व सीईओ जिबु के इट्टी, फ्री ट्रेड झोनचे सीईओ रंजित रे यांची उपस्थिती लाभणार आहे.

खोपटे येथील प्राथमिक शाळेच्या नवीन इमारतीच्या बांधकामाची अंदाजे रक्कम पाच कोटी १० लाख आहे. शाळेच्या पटांगणात होणाऱ्या या भूमिपूजन सोहळ्याच्या कार्यक्रमाचे प्रायोजक डीपी वर्ल्ड असून निमंत्रक रा. जि. प. शाळा खोपटे, बांधपाडा ग्रुप ग्रामपंचायत, बांधपाडा ग्रामस्थ मंडळ व हायस्कूल कमिटी आहे.

उरण तालुक्यात आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली विकासाचे चक्र सुरू झाले असून नागरिकांना विविध सोयी सुविधा उपलब्ध होत असल्याचे दिसून येत आहे.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विशेष लसीकरण मोहीम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

कोरोनाचा वाढता प्रादूर्भाव लक्षात घेता बंद झालेली महाविद्यालये पुन्हा सुरळीत सुरू झालेली आहेत. त्या दृष्टीने जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विशेष कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण शिबिर शनिवारी (दि. ३०) यशस्वीपणे झाले.

या शिबिराचे उद्घाटन प्रभारी प्राचार्य डॉ. निलेश कोळी यांच्या हस्ते झाले. या वेळी आयक्यूएसीचे समन्वयक प्रा. महेश्वरी झिरपे, एनएसएस विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रवीण सावे, डिएलएलई विभागप्रमुख प्रा. महेश धायगुडे, तसेच पनवेल महानगरपालिकेचे डॉ. वर्तिका



कोटनाला आणि त्यांचे सहकारी उपस्थित होते.

या लसीकरण माहिमेच्या यशस्वितेसाठी प्रा. रोहित पाटील, प्रा. राहुल कांबळे, प्रा. महादेव चव्हाण आणि प्रा. भरत सोलंकी याच्यासह शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनी कोरोना प्रार्दुभाव लसीकरण कार्यक्रमात सहभागी होऊन कोरोना प्रार्दुभाव लसीकरणाचा लाभ घेतला. प्रभारी प्राचार्य डॉ. निलेश कोळी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी आरोग्यविषयक प्रतिबंधात्मक उपाययोजनेत भाग घेतला.

या विशेष लसीकरण शिबिराचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले.

## ड्रेनेजच्या सभोवतालचा खड्डा बुजविला

▮ नगरसेवक विक्रांत पाटील यांचा पाठपुरावा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस स्टेशन समोर असलेल्या चौकात ड्रेनेज झाकणाच्या बाजूला पडलेला खड्डा नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या तत्परतेने बुजविण्यात आला.



स्वामी नित्यानंद मार्ग या मुख्य रस्त्यावरील तालुका पोलीस स्टेशन समोर असलेल्या चौकात ड्रेनेज झाकणाच्या बाजूला असलेले पेव्हर ब्लॉक दबले गेल्यामुळे खड्डा पडला होता. त्यामुळे रहदारीस अडचण निर्माण होत होती तसेच रिक्षा व दुचाकी वाहन चालकांना ही या खड्ड्यामुळे त्रास होत होता. या बाबतची तक्रार अनेक नागरिक, वाहनचालक आणि रिक्षा चालकांनी नगरसेवक विक्रांत पाटील यांच्याकडे केली.

विक्रांत पाटील यांनी महानगरपालिका अधिकारी आणि कॉन्ट्रॅक्टरला सांगून त्वरित हा त्रासदायक खड्डा बुजवून घेतला. याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

## नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी नगरसेवक मुकीद काझी तत्पर

**पनवेल : वार्ताहर**

नागरी प्रश्न सोडविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक मुकीद काझी तत्पर असून यासाठी ते त्यांच्या कार्यालयाच्या बाहेर उभे राहून नागरिकांचे प्रश्न तातडीने सोडवित आहेत. त्यामुळे मोहल्ला परिसरासह पनवेलमधील नागरिकांनी त्यांचे कौतुक केले आहे.



मोहल्ला परिसरात मुकीद काझी यांनी नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी मुख्य रस्त्यावरच एका दुकानात कार्यालय सुरू केले. या ठिकाणी त्यांनी एक पंखा सुद्धा लावून घेतला आहे व १० खुर्च्या तेथे आणून अनेक नागरिकांच्या समस्या रस्त्याच्या बाजूला बसून ते सोडवितात. त्यामुळे अनेक जण त्या ठिकाणी येऊन आपल्या व्यक्तीगत समस्या, पोलीस ठाणे व इतर समस्या त्यांच्या समोर मांडतात. काझीसुद्धा तातडीने संबंधित विभागाशी संपर्क साधून त्या समस्यांचे निराकरण करतात.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर व सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करीत असतो. त्यांचे प्रोत्साहन वेळोवेळी मिळत असल्याने काम करायला एक वेगळीच ऊर्जा मिळते. कुठे बसून काम करतो हे महत्त्वाचे नसून लोकांच्या समस्या त्वरित सोडविल्या जातात हे महत्वाचे आहे, असे नगरसेवक मुकीद काझी यांनी सांगितले.

## नवी मुंबईत फ्लेमिंगो सिटीसाठी प्रयत्न

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोपरखैरणे व वाशी येथे माहिती तंत्रज्ञानाचे जाळे उभे राहिल्याने या शहराची ओळख सायबर सिटी म्हणून पुढे आली होती. आता 'फ्लेमिंगो सिटी'साठी पालिका आणि काही खासगी संस्था प्रयत्न करणार आहे. ठाणे वन विभागाच्या वतीने ऐरोली येथे सुरू करण्यात आलेल्या सागरी जैवविविधता केंद्रातर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या रोहित पक्षी (फ्लेमिंगो) निरीक्षणाला मिळत असलेल्या उत्तम प्रतिसादाला अधिक चालना देण्यासाठी नवी मुंबई पालिकाही या आकर्षक पक्ष्याच्या निरीक्षणासाठी मचाण उभारण्याचा प्रस्ताव तयार करीत आहेत

राज्याच्या वन विभागाने ठाणे वन क्षेत्रावर ऐरोली खाडी पुलाजवळील मोकळ्या जागेत सागरी जैवविविधता केंद्र उभारले आहे. या केंद्रातून नोव्हेंबरनंतर फ्लेमिंगो दर्शनासाठी छोट्या फेरीबोटीची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे पर्यटकांचा ओढा आता या जैवविविधता केंद्राकडे वाढला आहे. नवी मुंबई क्षेत्राला मिळालेल्या या फ्लेमिंगो पक्ष्याच्या अधिवासाचा उपयोग पर्यटन विकसित करण्यासाठी करण्याचा पालिकेने प्रस्ताव तयार केला आहे.

नवी मुंबई हा खाडीकिनारा भाग असल्याने गुजरातमधून मोठ्या प्रमाणात फ्लेमिंगो पक्षी हिवाळ्यात हजारो मैलांचे अंतर पार करून नवी मुंबई, उरण या भागांत येत असल्याचे दिसून आले आहे. ओहोटीनंतर मोकळ्या होणाऱ्या खाडीच्या भूभागावर या पक्ष्याचे खाद्य असल्याने या पक्ष्यांचे थवेच्या थवे या भागात पाहण्यास मिळतात. फ्लेमिंगो पक्ष्याचा हा सहवास महामुंबईच्या इतर क्षेत्रांत नाही. त्यामुळे वन विभागाप्रमाणेच नवी मुंबई पालिकेनेही या प्लेमिंगो पक्ष्याच्या निरीक्षणासाठी काही जागा निश्चित करण्याचा निर्णय घेतला आहे.

**नवी मुंबईची ओळख भविष्यात फ्लेमिंगो सिटी म्हणून व्हावी असे प्रयत्न सुरू आहेत. वन विभागाच्या परवानगीने त्या ठिकाणी पक्षी निरीक्षण स्थळ उभारण्याचा प्रस्ताव तयार केला जात आहे. यातून पर्यटनाला चालना मिळेल.**
**-अभिजित बांगर, आयुक्त, महापालिका**

वन विभागाच्या परवानगीने त्या ठिकाणी पक्षी निरीक्षण स्थळ उभारण्याचा प्रस्ताव तयार केला जात आहे. वाशी येथील सीशोअर परिसरात अशा प्रकारची निरीक्षण ठिकाणे उभारता येण्यासारखी आहेत. ही निरीक्षण ठिकाणे सेल्फी पॉइन्ट म्हणूनदेखील विकसित केली जाणार आहेत.



## आरोग्य अभियान व कुटूंब कल्याण सोसायटीची सभा

**पनवेल : प्रतिनिधी**

एकात्मिक आरोग्य अभियान व कुटूंब कल्याण सोसायटी, पनवेल संस्थेच्या नियामक मंडळाची पहिली बैठक शुक्रवारी (दि. २९) महापौर दालनात झाली. आरोग्य सेवेबाबत शासनाने मंजूर केलेले निधी आणि प्रकल्प यावर चर्चा करून त्या विषयास या वेळी मान्यता देण्यात आली.



या सोसायटीच्या अध्यक्षपदाचा आयुक्त गणेश देशमुख यांनी कार्यभार स्वीकारल्यावर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीसाठी सोसायटीचे सदस्य उपसंचालक आरोग्य सेवा ठाणे यांचे प्रतिनिधी डॉ. सोनावणे, जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. सुहास माने, जिल्हा ग्रामीण विकास अभिसरण प्रकल्प अधिकारी रणधीर सोमवंशी, महाराष्ट्र राज्य् एडस् नियंत्रण संस्था यांचे प्रतिनिधी संजय माने, जिल्हा इंडियन मेडिकल असोशिएशनचे अध्यक्ष डॉ. गिरीश गुणे, जिल्हा फेडरेशन ऑफ ऑबस्टेट्रीक्स अॅण्ड गायपॅकोलॉजिस्ट ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश पाटील, उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार, सहाय्यक रचनाकार ज्योती कवाडे, सदस्य सचिव डॉ. मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी आनंद गोसावी, जयराम पादीर उपस्थित होते.

दिव्यांग रूग्णांना जिल्हा शल्य चिकित्सक यांच्यामार्फत मिळणाऱ्या दाखल्यासांठी अलिबाग येथे जावे लागते. हा त्रास कमी करण्याच्या दृष्टीने लवकरच पनवेलमध्ये दिव्यांगासाठी महाशिबिराचे आयोजन करण्यावरती चर्चा करण्यात आली. या वेळी नव्याने आलेल्या सदस्यांना या सोसायटीच्या नियामक मंडळावर स्वीकृत करण्याच्या ठरावास मान्यता देण्यात आली. कार्यरत असलेले मनुष्यबळ एकात्मिक आरोग्य अभियान व कुटुंब कल्याण सोसायटी यांचेकडे वर्ग करणेबाबतच्या विषयाला मंजूरी देण्यात आली.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०२१-२२साठी मंजूर प्रकल्प आराखड्याप्रमाणे मान्यता मिळालेल्या निधीचा विषय मंजूर करण्यात आला. सन २०२१-२२ मंजूर प्रकल्प आराखड्यामध्ये ६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दुरुस्ती व नुतनीकरणासाठी मंजूर झालेल्या निधीप्रमाणे कार्यवाही करणेकामीच्या विषयास मान्यता देण्यात आली.




अर्थ प्रहर

# आर्थिक आणि प्रादेशिक विषमता कमी करण्याचे स्वागतार्ह मार्ग



यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)

**जन धन योजनेच्या मार्गाने सर्वसामान्य नागरिकांची वाढत असलेली आर्थिक समावेशकता तसेच गव्हर्नमेंट ई पोर्टल आणि डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफरच्या मार्गाने राज्य सरकारांची होणारी बचत आणि आर्थिक व्यवहारात येत असलेली पारदर्शकता हीच नागरिक आणि प्रदेशांतील विषमता कमी करणारी ठरणार आहे.**




देशात आर्थिक समावेशकता वाढत असल्याच्या दोन चांगल्या घटना सध्या घडत आहेत. पहिली आहे ती वैयक्तिक नागरिकाची आर्थिक समावेशकता वाढू लागल्याची आणि दुसरी घटना मागास समजल्या जाणाऱ्या उत्तर प्रदेशने या क्षेत्रात घेतलेल्या आघाडीची. देशातील सर्व नागरिकांना बँकिंग करण्याची सुविधा सहजपणे मिळणे ही आर्थिक सामावेशकता वाढण्यासाठीची पूर्वअट आहे, पण बँकांचे राष्ट्रीयीकरण होऊनही त्यात मोठी प्रगती होऊ शकली नव्हती. त्यामुळेच २०१४ पूर्वी देशातील ५० टक्के नागरिक बँकिंगपासून दूर होते, पण त्या वर्षी पंतप्रधानांनी जाहीर केलेल्या प्रधानमंत्री जन धन योजनेमुळे हे चित्र बदलत चालले आहे. आता देशातील ८० टक्के नागरिकांना बँकिंग करणे शक्य झाले आहे.

### जन धन खाती झाली ४४ कोटी

१५ ऑगस्ट २०१४ला जाहीर झालेल्या आणि त्याच महिन्यात २८ तारखेला लागू झालेल्या प्रधानमंत्री जन धन योजनेचा लाभ घेणाऱ्या नागरिकांची संख्या ऑक्टोबर २०२१मध्ये तब्बल ४४ कोटी झाली आहे. नव्याने बँकिंग करू लागलेल्या या नागरिकांनी आपल्या बँक खात्यात १.४६ लाख कोटी रुपये ठेवले आहेत. त्यातील अनेक जण अजून नियमित बँकिंग करू शकत नाहीत, पण नजीकच्या भविष्यात हे चित्र बदलणार आहे. सात वर्षांतील आर्थिक समावेशकतेचा हा मोठाच टप्पा म्हटला पाहिजे, कारण बँकिंगची ओळख झाल्याशिवाय बँकेचे कर्ज, विमा योजना, निवृत्ती आणि गुंतवणुकीचे नवे मार्ग याची ओळख सर्वसामान्य नागरिकांना होत नाही. असे नागरिक मग अशा सर्व संघटीत व्यवस्थेपासून दूर राहतात. आर्थिक विषमता वाढीचे हे प्रमुख कारण आहे. देशातील गरजू नागरिकांना थेट मदत करण्यासाठी जन धन बँक खाती कशी उपयोगी ठरली, हे आपण कोरोना संकटात पाहिलेच आहे. डीबीटीच्या मार्गाने गरजू नागरिकांच्या बँक खात्यात थेट पैसे जमा करणे शक्य झाले, कारण जन धन बँक खात्याच्या मार्गाने ती व्यवस्था तयारच होती.

### गव्हर्नमेंट ई पोर्टलमध्ये आघाडी

दिल्लीला लागून असलेला नोएडा, गाझियाबाद हा उत्तर प्रदेशचा भाग आहे, पण ही श्रीमंत शहरे पाहून उत्तर प्रदेशची कल्पना येऊ शकत नाही, कारण २४ कोटी लोकसंख्येचा या प्रदेशात अजूनही ग्रामीण भागात राहणाऱ्या नागरिकांची संख्या अधिक आहे. वीस पैकी तब्बल १७ कोटी नागरिक तेथे ग्रामीण भागात राहतात. म्हणजे देशातील ग्रामीण भागात राहणाऱ्या एकूण लोकसंख्येचा विचार करता हे प्रमाण तब्बल १८ टक्के इतके आहे. आधुनिक जगात आर्थिक समृद्धी ही शहरांत पाहायला मिळते आहे. त्यामुळे ज्या राज्यांत वेगाने शहरीकरण झाले त्या राज्यांत आर्थिक स्थिती सुधारल्याचे आपल्याला पाहायला मिळते. उत्तर प्रदेश आणि बिहारमधील नागरिक महाराष्ट्र आणि दिल्लीत येण्यासाठी का प्रयत्न करतात, हे यावरून लक्षात येते. महाराष्ट्राचे सरासरी दरडोई उत्पन्न दोन लाखांच्या घरात आहे, तर उत्तर प्रदेशात ते त्याच्या निम्मेही नाही. यावरून हा फरक लक्षात येतो.

अशा या उत्तर प्रदेशमध्ये आर्थिक समावेशकता आणि आर्थिक व्यवहारातील पारदर्शकतेविषयी काही चांगल्या घटना घडल्या असून त्याचे स्वागत केले पाहिजे. राज्य सरकारे करीत असलेली खरेदी पारदर्शी, कार्यक्षम आणि गतीने व्हावी, यासाठी गव्हर्नमेंट ई पोर्टल किंवा जीईएमची स्थापना करण्यात आली आहे. (२०१६) सरकारांच्या खरेदीमध्ये पैशांना गळती लागत होती तसेच कमी दर्जाचा माल घेतला जात होता, पण सरकारे आणि त्यांना पुरवठा करणारे सर्व पुरवठादार या पोर्टलवर एकत्र आले असून त्यांच्यात होत असलेल्या खुल्या स्पर्धेमुळे ही त्रुटी दूर होण्यास मदत झाली आहे. गेल्या तीन वर्षांत उत्तरप्रदेशने या पोर्टलचा सर्वाधिक वापर केला आहे. २०२०-२१मध्ये तर उत्तर प्रदेशने त्यावर चार हजार ६११ कोटी रुपयांची खरेदी केली आहे. देशातील अनेक राज्ये सध्या अपुऱ्या महसुलाचा सामना करत आहेत. या पार्श्वभूमीवर जीईएमच्या माध्यमातून होणाऱ्या खरेदीतील बचतीचा फायदा उत्तर प्रदेशाला झाला, असे म्हणता येईल.

### ४६ हजार ७०० कोटी रुपयांची डीबीटी

उत्तर प्रदेशाने घेतलेली दुसरी झेप त्यापेक्षाही महत्त्वाची आहे. ती म्हणजे डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर किंवा डीबीटीमध्ये त्याने देशात दुसरा क्रमांक पटकावला आहे. उत्तर प्रदेशपेक्षा आकाराने आणि लोकसंख्येने खूपच छोटे (पाऊणे तीन कोटी) राज्य असलेल्या हरियाणाचा या योजनेचे गुण ८८.८ तर उत्तर प्रदेशला ८५.२ टक्के गुण मिळाले आहेत. उत्तर प्रदेशचा विस्तार आणि ग्रामीण भागातील लोकसंख्येचे अधिक प्रमाण लक्षात घेता, हे उल्लेखनीय म्हटले पाहिजे. उत्तर प्रदेशने या आर्थिक वर्षात डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफरने ४६ हजार ७०० कोटी रुपये गरजू नागरिकांच्या बँक खात्यावर जमा केले, तर या पद्धतीचा अधिकाधिक वापर केल्यामुळे सरकारचे ६९ कोटी रुपये वाचले आहेत. डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफरची सोय नव्हती तेव्हा सामाजिक योजनांचा फायदा गरजूंना देताना किती गैरव्यवहार आणि अडवणूक होत होती. हे वेगळे सांगण्याची गरज नाही. उत्तर प्रदेशासारख्या मागासलेल्या राज्यात तर हे प्रमाण अधिक होते. या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशातील हा चांगला बदल म्हटला पाहिजे.

### कॉमन सर्विस सेंटरचा वाटा

उत्तर प्रदेशने हे कसे शक्य केले, हेही जाणून घेतले पाहिजे. त्या राज्यात एक लाख ३० हजार ग्रामपंचायतींमध्ये कॉमन सर्विस सेंटर (सीएससी) आहे. ज्यामुळे सर्व सरकारी योजनाचा लाभ घेण्यात येणाऱ्या अडचणी दूर होतात. अशा सेंटरची संख्या सतत वाढत जाईल. यासाठी उत्तर प्रदेशात विशेष प्रयत्न केले गेल्याचे दिसते, कारण मार्च २०१९ ते मार्च २०२० या एका वर्षात असे सेंटर वाढीचा तेथील दर १५ टक्के राहिला जो देशात सरासरी पाच टक्केच राहिला. पॉइंट ऑफ सेल मशीनचा वापर स्वस्त धान्याच्या दुकानांमध्ये वाढविण्यात आल्यामुळे सरकारचे १२०० कोटी रुपये वाचले आहेत. स्वस्त धान्य घेणाऱ्या नागरिकांचे प्रमाण तेथे सर्वाधिक आहे आणि त्यात गैरव्यवहार होण्याचे प्रमाणही सर्वाधिक होते, पण व्यवहारात या सेंटरद्वारे पारदर्शकता आल्यामुळे हा स्वागतार्ह बदल झाला आहे.

आपल्या देशातील आर्थिक विषमतेविषयी आपण जेव्हा बोलतो, तेव्हा सर्वसामान्य नागरिकांना देशाच्या आर्थिक विकासात भाग घेता आला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करतो. तसेच विकसित राज्ये आणि मागासलेली राज्ये यांच्यातील आर्थिक दरी कमी झाली पाहिजे, असे आपल्याला अपेक्षित असते. जन धन योजनेच्या मार्गाने अशा नागरिकांपर्यंत आर्थिक समावेशकता पोचते आणि गव्हर्नमेंट ई पोर्टल, कॉमन सर्विस सेंटरच्या मार्गाने मागास राज्यातील अर्थव्यवहार पारदर्शी आणि जलद होऊन त्यांच्या आर्थिक प्रगतीला गती मिळते. या दोन्ही गोष्टी आपल्यातील भेद कमी करणाऱ्या असल्याने त्यांचे स्वागत केले पाहिजे.

---

**बाजारात होत असलेले चढउतार हा बाजाराचा स्थायीभाव आहे. अशा बाजारात त्याच्या मूडची पर्वा न करता आपल्या विश्लेषणावर ठाम विश्वास ठेवून गुंतवणूक सुरू ठेवणे, हाच बाजारातून पैसे मिळविण्याचा मार्ग आहे. याचे प्रत्यंतर गेले काही दिवस येतेच आहे आणि पुढील काळातही ते येतच रहाणार आहे.**

# बाजाराच्या मूडची पर्वा किती करणार?



प्रसाद ल. भावे
sharpadvisers@gmail.com

राजेश आणि सुरेश हे दोन मित्र होते आणि त्यांना एकाच कंपनीत नोकरी मिळाली होती. वर्षभरानंतर राजेशला बढती मिळाली आणि सुरेशला नाही. सुरेशने तक्रार केली असता केवळ काम पुरेसं नाही, असं त्यास उत्तर देण्यात आलं. प्रात्यक्षिक म्हणून, त्यांच्या वरिष्ठानं सुरेश आणि राजेश यांना बाजारात केळी विक्रेते किती आहेत ते तपासण्यास सांगितलं. सुरेश परत आला आणि म्हणाला, केवळ एकच केळी विक्रेता आहे. बॉसनं त्याला परत जाऊन केळीचे भाव तपासायला सांगितले. तो पुन्हा गेला आणि ६० रुपये डझन असे उत्तर घेऊन परत आला. आता बॉसनं राजेशला विचारलं आणि त्यानं उत्तर दिलं की केवळ एकच केळी विक्रेता असून त्यास ६० रुपये डझननं केळी विकायची होती आणि जर कोणाला त्याची सर्व केळी म्हणजेच ३० डझन विकत घ्यायची असतील तर तो ३० प्रति डझनला विकायला तयार आहे. म्हणून, जर त्यांनी संपूर्ण ३० डझन केळी खरेदी केल्यास आणि ती अगदी ५५ ला विकू शकल्यास त्यांना नफा म्हणून ७५० रुपये कमावता येतील. हे उत्तर ऐकल्यावर सुरेशच्या लक्षात आलं की फक्त मेहनत पुरेशी नाही, तर चाणाक्ष विचार करणंही गरजेचं आहे.

आज, आम्हाला नेहमी असंच वाटतं की शेअरबाजार आपल्यापुढं एक पाऊल आहे आणि त्यास पराभूत करणं खूप कठीण आहे. जरी हो गोष्ट खरी असली तरी जर आपण आपल्या पद्धतीनं बाजारामध्ये गुंतवणूक करत राहिलो आणि बाजाराच्या मनमानी लहरींवर स्वार न होता टिकून राहिलो तर आपणही बाजारास मागं टाकू शकतो. याचा ताजा अनुभव आयआरसीटीसीमध्ये सरकारी हस्तक्षेप, त्यानंतर शेअरच्या किंमती कोसळणं आणि पुन्हा सरकारकडून आपल्या निर्णयावर घुमजाव झाल्यानं शेअरच्या किमतीत तळापासून २० टक्क्यांची वाढ.

### बाजाराच्या मूडची पर्वा करावी काय?

त्यामुळं बाजारातील भय आणि लोभ यांबद्दल वॉरेन बफे यांच्या सोप्या म्हणी लक्षात ठेवा. १९७२ ते २०२१ या कालावधीतील 'युनिव्हर्सिटी ऑफ मिशिगन'च्या ग्राहक आत्मविश्वास निर्देशांकाच्या आलेखावरूनही हे सिद्ध झालं आहे की, जेव्हा जेव्हा बाजारात (खालील उदाहरणात अमेरिकेच्या SP ५०० निर्देशांकाचा आलेख) नकारात्मक सेंटीमेंट होती तेव्हा पुढील एका वर्षामध्ये बाजारानं चांगला परतावा दिलेला दिसतो. उदाहरणार्थ, २००१, २००८ व २०२०मध्ये जेव्हा बाजारातील भावना नकारात्मक होत्या, तेव्हा पुढील एका वर्षाचा परतावा अनुक्रमे १८ टक्के, २७ टक्के आणि २३ टक्के इतका सकारात्मक होता. त्याचप्रमाणे, बहुतेक कालावधीत, जेव्हा भावना सकारात्मक होत्या, तेव्हा पुढील एका वर्षात परतावा नकारात्मक होता. अशा प्रकारे, जेव्हा बाजारातील भावना सकारात्मक किंवा नकारात्मक असतात तेव्हा अति उत्साहीत किंवा निराश होऊन बाजारातून बाहेर पडण्यात काहीच अर्थ नाही. तात्पर्य : ''बाजाराच्या मूडची पर्वा न करता, तुमच्या विश्लेषणाद्वारे घेतलेल्या तुमच्या स्वतःच्या निर्णयानं निश्चित गुंतवणूक करत रहा'' – प्रभा.



### परकीय गुंतवणूकदारांमुळे पडझड

१९ ऑक्टोबरच्या ६२२४५ शिखरावरून शुक्रवारी सेन्सेक्सनं ५९१०० पातळीखाली डुबकी लावली असून तांत्रिकरीत्या सेन्सेक्सला ५८८०० व ५५८०० या पातळ्यांवर आधार संभवतो. सेन्सेक्सच्या ३० शेअर्समधून सर्वांत पडझड अनुभवलेले शेअर्स म्हणजे हिंद-युनिलिव्हर, टीसीएस व एचसीएल टेक जे एका महिन्यात अनुक्रमे १२ टक्के व प्रत्येकी १०-१० टक्के खाली आले आहेत. तर निफ्टी ५० मध्ये प्रतिनिधित्व करणारा आयशर मोटर्सचा शेअर १४ टक्के पडला आहे. एकूण क्षेत्रनिहाय विचार केल्यास सरकारी क्षेत्रातील बँकांच्या निर्देशांकानं गेल्या एका महिन्यात १७.८ टक्के वाढ नोंदवली आहे तर निफ्टी एफएमसीजी निर्देशांकानं ६ टक्के झळ सोसलेली आहे.

मागील आठवड्यात बाजारात विक्रीचा दबाव राहिला आणि यात परकीय गुंतवणूकदार आघाडीवर होते. एकूणच ऑक्टोबर महिन्यात त्यांच्या विक्रीचा आकडा २५५७२ कोटी रुपये असून गेल्या आठवड्यातील विक्रीचा आकडा १५७०२ कोटी रुपये आहे. याला कारणं अनेक असू शकतील. एकूणच जगभरात महागाईचे असलेले वारे, कच्च्या तेलाच्या वरील पातळीवर स्थिरावणाऱ्या किमती आणि याचबरोबर सुमारे ४७५०० कोटी रुपयांचे आयपीओ येत असल्यानं त्यामध्ये गुंतवणूक करण्यासाठी किरकोळ गुंतवणूकदारांनीदेखील नफावसुली करून पैसे काढून घेण्यावरच भर दिलेला दिसतोय.

### 'फिनो पेमेंट' बँकेचा आयपीओ

गेल्या दोन लेखांत आपण नायका आणि पेटीएम यांच्या आयपीओबद्दल जाणून घेतलं, तर आज आपण जाणून घेऊ अजून एक चांगल्या व असाधारण कामकाजाद्वारे आपली छाप पाडणाऱ्या 'फिनो पेमेंट' बँकेबद्दल.

या कंपनीची सुरुवात २००७मध्ये फिनटेक फाऊंडेशननं केली असून २०१७मध्ये कंपनीस आरबीआयकडून पेमेंट बँकेची परवानगी मिळाली. यामध्ये आयसीआयसीआय बँक, भारत पेट्रोलियम व आंतरराष्ट्रीय ब्लॅकस्टोन या दिग्गज कंपन्यांची गुंतवणूक आहे. ही एक झपाट्यानं वाढणारी फिनटेक फर्म आहे, जी डिजिटल आर्थिक उत्पादनं आणि सेवांमध्ये पेमेंटवर अधिक लक्ष केंद्रित करत आहे. साधारणपणे साडेसहा लाखांवर बँकिंग सुविधा केंद्रे, ५४ बँक शाखा आणि १४३ ग्राहक सेवा पॉइंट्ससह, फिनो पेमेंट बँक भारतातील ९४ टक्के जिल्हानिहाय क्षेत्रांमध्ये उपलब्ध आहे. ही कंपनी स्वतःची मालमत्ता बनवण्यात रस ठेवत नसून त्यांच्याकडं कमी-मालमत्तेचे (लाईट ॲसेट क्लास)कंपनी मॉडेल आहे जे प्रामुख्याने त्यांच्या व्यापारी नेटवर्क आणि लक्ष्य ठेवलेल्या व्यावसायिक करारांमधून फी आणि कमिशनच्या उत्पन्नावर अवलंबून राहते. प्रत्येक व्यापारी त्याच्या समुदायाच्या बँकिंग आणि आर्थिक गरजा पूर्ण करतो, त्यांच्या सहाय्यक-डिजिटल इकोसिस्टमचा कणा बनवतो, ज्याला त्यांचे फिजिटल वितरण मॉडेल (भौतिक आणि डिजिटल यांचे मिश्रण) म्हणूनही ओळखले जाते. अशा व्यापाऱ्यांचा तंत्रज्ञानाचा वापर (टच पॉईंट्स), तसेच कंपनी गोळा करत असलेल्या. डेटावर विश्लेषणाचा वापर केल्यामुळं विद्यमान क्लायंटला थर्ड पार्टी सेवांची क्रॉस-सेल करण्याची क्षमता पुरवते ज्यामुळं महसूल वाढण्यास मदत होऊन एकूण उत्पादन आणि सोल्यूशन ऑफरिंग आणखी सह-अनुकूलित करता येतं, जेणेकरून कंपनीच्या ग्राहकास बँक सुविधा मिळवण्यासाठी कोणत्याही बँकेत जाऊन आपला वेळ खर्च करण्याची गरज भासणार नाही तर अगदी जवळच्या किराणा दुकानदार, कॉफी शॉप, मेडिकल स्टोर्स, मिठाई दुकान, अशा व्यवसायिकांना बँक आपले एजंट बनवून अशा ठिकाणांहून सुद्धा ग्राहकांच्या पेमेंट गरजा पूर्ण करत असून याचप्रकारे कंपनी आपलं नेटवर्क विस्तृत करत आहे. असंख्य चालू आणि बचत खाती ("CASA"), डेबिट कार्ड जारी करणं आणि लिंक केलेले व्यवहार, देशांतर्गत पैसे पाठवणं, खुली बँकिंग वैशिष्ट्यं (ॲप्लिकेशन प्रोग्रामिंग इंटरफेसद्वारे ("API"), (मायक्रो-एटीएमद्वारे




किंवा आधार सक्षम पेमेंट सिस्टम ("AePS") आपल्या बँक खात्यात पैसे जमा करणं व काढणं, विमा, बिलं भरणं, पैसे भरणं किंवा काढणं आणि रोख व्यवस्थापन सेवा (CMS) ही कंपनीची उत्पादनं व प्रमुख सेवा आहेत. त्याखेरीज, कंपनीचे किरकोळ विक्रेते त्यांच्या समुदायांमध्ये त्यांचे विद्यमान क्लायंट कनेक्शकनदेखील वापरतात त्यामुळे त्यांच्या समुहामध्ये कंपनीस अतिरिक्त आर्थिक उत्पादने आणि सेवा जसे की थर्ड-पार्टी गोल्ड लोन, विमा, बिल पेमेंट आणि विविध रीचार्ज करण्यारसाठी मदत करत असतात.

### एनपीएच्या जोखमीपासून दूर

फिनो पेमेंट्स बँकेने FY२०१९-२१मध्ये एकूण महसुलात ४६ टक्के CAGR नी वाढ दर्शवली आहे व FY१९मधील ६२.३ कोटी रुपयांच्या तोट्यामधून मागील वर्षी कंपनीनं प्रथमच २० कोटी रुपयांचा नफा नोंदवला आहे. कंपनी इतर एनबीएफसी अथवा बँकेबरोबर टाय-अप करून कंपनी लोन देत स्वतःला लोन देण्यापासून दूर ठेवत आहे. त्यामुळं या कंपनीची खास बात म्हणजे कंपनी कोणतेही लोन आपल्या खात्यामध्ये घेत नसल्यानं एनपीएच्या जोखमीपासून ही कंपनी दूर राहिलेली आहे. सध्या तरी कंपनीस थेट स्पर्धक नसून याचा फायदा याच्या प्राथमिक समभाग विक्रीस होऊ शकतो. फिनो पेटेक ही सध्या कंपनीची १०० टक्के प्रवर्तक कंपनी आहे. कंपनीची प्राथमिक समभाग विक्री ही २९ ऑक्टोबरपासून सुरू झाली असून किंमतपट्टा ५६०-५७७ रुपये ठरवण्यात आलेला आहे. आयपीओ उघडल्यापासून केवळ पहिल्या १५ मिनिटांतच किरकोळ गुंतवणूकदार श्रेणीस संपूर्ण प्रतिसाद मिळाला आहे. अजूनही दोन दिवस हा आयपीओ खुला राहणार असून दीर्घ मुदतीसाठी या कंपनीमध्ये गुंतवणूक करण्यास हरकत नाही.

# धाटावच्या ऐल्पे केमिकल्समध्ये दोन कामगार भाजले

## कंपनीविरोधात आवाज उठवणार -ॲड. महेश मोहिते

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील धाटाव औद्योगिक वसाहतीमधील ऐल्पे केमिकल्स कंपनीत शनिवारी दोन कामगार भाजले. या कंपनीत वारंवार अपघात होत असल्याने कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्याकडे शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी भाजप आवाज उठवणार असल्याचे जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते यांनी सांगितले. ते पत्रकारांशी बोलत होते.



(छाया : जितेंद्र जाधव)

रोहा इंडस्ट्रीज असोसिएशनचचे अध्यक्ष पी. पी. बारदेशकर यांच्या मालकीच्या ऐल्पे केमिकल्स कंपनीत दोन महिन्यांपूर्वी एका कामगाराला आपली दोन बोटे गमवावी लागली होती. तर शनिवारी दोन कामगार भाजले आहेत. मात्र त्याबाबत अधिकृत माहिती देण्यास कंपनी व्यवस्थापन टाळाटाळ करीत आहे.

दरम्यान, ऐल्पे कंपनीतील दुर्घटना काही पत्रकारांनी दूरध्वनीद्वारे भाजपचे जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यावेळी ॲड. मोहिते म्हणाले की, ऐल्पे केमिकल्स कंपनीत अपघातांची मालिका सुरू आहे. तेथील कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्याकडे आगामी हिवाळी अधिवेशनात विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्यात येईल तसेच कंपनीविरोधात आवाज उठवणार असल्याचे ॲड. मोहिते यांनी पत्रकारांना सांगितले

**ऐल्पे केमिकल्समध्ये शनिवारी अपघात झाला, त्यात दोन कामगार भाजले, त्यांना ऐरोली येथील नॅशनल बर्न हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. या अपघाताबाबत कारवाई करुन कंपनीवर गुन्हा दाखल करण्यात येईल.**

**-अजित मोहिते, फॅक्टरी इन्स्पेक्टर, मुंबई**

# माथेरानमधील वाहनतळाच्या जागेत बांधकाम साहित्य

## पर्यटकांची गैरसोय; वनव्यवस्थापन समिती, वनखात्याचे दुर्लक्ष

**कर्जत : बातमीदार**

माथेरानमध्ये सध्या मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू आहेत. त्यासाठी लागणाऱ्या बांधकाम साहित्याची साठवणूक दस्तुरी येथील वाहनतळाच्या जागेत करण्यात येत आहे. त्यामुळे माथेरनला येणाऱ्या पर्यटकांना वाहने उभी करण्यासाठी जागा उपलब्ध होत नाही, त्याकडे वनव्यवस्थापन समिती आणि वनखात्याचे दुर्लक्ष होत आहे.


(छाया : संतोष पेरणे)

माथेरानमध्ये सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेशबंदी आहे. त्यामुळे वनव्यवस्थापन समिती व वनखात्याने दस्तूरी नाका येथे वाहनतळ उभारले आहे. पर्यटक आपली वाहने तेथे उभी करुन माथेरानमध्ये येतात. मात्र माथेरानमध्ये सुरु असलेल्या विकासकामांसाठी लागणाऱ्या जांभा दगड, सिमेंट, काळा दगड, पेव्हर ब्लॉक, ग्रीट इत्यादी बांधकाम साहित्याची या वाहनतळाच्या जागेत साठवणूक केली जात आहे. येथून हे साहित्य इच्छितस्थळी नेण्यास संबंधीत ठेकेदार अनुकूल दिसत नाहीत आणि त्याकडे वनव्यवस्थापन समिती व वनखात्याचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे पर्यटकांना पार्किंग बाबतच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

बहुसंख्य पर्यटक आपल्या वाहनाने माथेरानला येत असतात. दस्तुरीनाका येथील वाहनतळाच्या बहुतांश भागात सुशोभीकरणासाठी लागणारे साहित्य आणि जांभ्या दगड ठेवण्यात आला आहे. त्यामुळे पर्यटकांना आपली वाहने कुठे व कशी उभी करावी, हा प्रश्न पडतो. वीकेण्डमध्ये तर वाहने उभी करण्यासाठी जागा उपलब्ध होत नाही. कित्येक पर्यटकांना यामुळे माघारी फिरावे लागत आहे. माथेरानचा दिवाळी पर्यटक हंगाम आत्ता सुरू होत आहे. त्यामुळे पर्यटकांची संख्या वाढणार असून वाहनांचीसुध्दा गर्दी होणार आहे. वनव्यवस्थापन समिती आणि वनखात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पर्यटकांना पार्किंगबाबत होत असलेल्या अडचणींवर लवकरात लवकर पर्याय उपलब्ध करून घ्यावा, अशी मागणी होत आहे. अन्यथा याचा परिणाम माथेरानच्या पर्यटनावर होऊ शकतो, असे येथील नागरिकांन मधून बोलले जात आहे.

**तर वनव्यवस्थापन समिती आर्थिक तोट्यात...**

माथेरानचे वाहनतळ हे वनव्यवस्थापन समिती व वनखाते यांच्या अखत्यारीत येते. येणाऱ्या प्रत्येक वाहनांची कर आकारणी केली जाते. त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून वनखाते व वनव्यवस्थापन समिती माथेरानमध्ये विविध विकासकामे करीत असते. वाहनतळामध्ये झालेल्या अतिक्रमणामुळे या जागेत वाहने उभी करण्याची संख्या घटू शकते. परिणामी वनविभागाला व वनव्यवस्थापन समितीला आर्थिक तोटा सहन करावा लागू शकतो असे स्थानिकांचे मत आहे.

**वाहनतळासाठी तात्पुरती जागा देण्याची मागणी**

पर्यटन हंगामात पर्यटकांच्या गाड्यांची संख्या जास्त असते. त्यामुळे पार्किंग फुल होते व पर्यटकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. तो टाळण्यासाठी माथेरानमधील गव्हर्नर हिलकडे जाणाऱ्या रस्त्यावर तात्पुरत्या स्वरूपात जागा देण्याबाबत वन व्यवस्थापन समितीने वनविभागाकडे मागणी केली आहे.

**दस्तूरी नाका येथील वाहनतळात ८ ते १० ठेकेदारांनी बांधकाम साहित्य ठेवले आहे. ते साहित्य वेळेत उचलले जात नाही, ही गंभीर बाब आहे. वन विभागाने संबंधीतांवर कारवाई करावी, अशी मागणी वन व्यवस्थापन समितीने सर्वसाधारण सभेमध्ये केली आहे.**

**-योगेश जाधव, अध्यक्ष, वन व्यवस्थापन समिती, माथेरान**

**बहुसंख्य पर्यटक आपल्या गाड्या घेऊन येतात. माथेरानमध्ये एकमेव वाहनतळ आहे. पर्यटकांच्या गाड्या जर वाहनतळात उभ्या राहिल्या नाहीत तर माथेरानच्या पर्यटनावर परिणाम होईल. वाहनतळात साहित्य ठेवणाऱ्या ठेकेदारांवर वनविभागाने कठोर कारवाई करण्याची गरज आहे.**

**-प्रकाश सुतार, माजी नगरसेवक, माथेरान**

# खालापुरात कंपनी मॅनेजरकडून महिला कर्मचाऱ्याकडे शरिरसुखाची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ज्योती स्टिल कारखान्यात काम करणाऱ्या महिला सहकाऱ्याचा विनयभंग तसेच तिच्याकडे शरिरसुखाची मागणी करणाऱ्या दिवाकर ओझा (रा. ताकई, ता. खालापूर) विरोधात पीडितेने खोपोली पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

**पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**

पीडित महिला ही खोपोली शहरात राहणारी असून ज्योती स्टिल कारखान्यात उच्च पदावर काम करीत होत्या. दिवाकर ओझा हा प्लांट मॅनेजर असून ओझा याला कामाचा अहवाल देण्याचे काम पीडित महिलेचे होते. गेल्या सहा महिन्यापासून ओझा पीडिते महिलेला सातत्याने शारिरीक व मानसिक त्रास देत होता. तिच्याकडे बघून अश्लिल हावभाव, हात पकडून व शरीरावरून हात फिरवून मनात लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करून ओझाने विनयभंग केला. तसेच शरिरसुख दिल्यास पगारवाढ देण्याचे आमिष ओझा पीडितेला दाखवत होता. मात्र पीडितेने विरोध केल्याने ओझाने तिला त्रास देत नोकरी सोडण्यास भाग पाडले. असह्य झाल्यावर पीडित महिलेने सर्व प्रकार घरी सांगितला. त्यानंतर पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून दिवाकर ओझा विरोधात खोपोली पोलीस ठाण्यात भादंवि कलम ३५४,३५४(अ),५०९,५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिवाकर ओझा याला अद्याप अटक करण्यात आली नाही. अधिक तपास सहाय्यक निरीक्षक एस. काळसेकर करीत आहेत.

# बालकाची हत्या करणाऱ्या आरोपीला पोलीस कोठडी

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील बोर्ले येथील रुद्र यादव या दोन वर्षाच्या बालकाची हत्या करणारा आरोपी संतोष अशोक यादव याला माणगाव येथील न्यायालयाने सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. रुद्र यादव याला आरोपी संतोष यादव (वय ३०) याने २६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी बोर्ले गावातून जबरदस्तीने पळवून नेले होते. त्यानंतर रुद्रची हत्या करून त्याचा मृतदेह चणेरा रस्त्यालगत आरे (ता. रोहा) गावच्या हद्दीत टाकून संतोष यादवने पळ काढला होता. पोलिसांनी त्याला गुरुवारी (दि. २८) सिल्व्हासा (गुजरात) येथून ताब्यात घेतले होते. अधिक चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली होती. आरोपी संतोष यादव याला शुक्रवारी माणगाव न्यायालयाने त्याला सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

# माथेरानच्या विकासकामांचा आयुक्तांनी घेतला आढावा

**कर्जत : बातमीदार**

माथेरानमध्ये विविध विकासकामे सुरू असून काही कामे पूर्ण झाली आहेत. त्या कामांचा तपशीलवार आढावा घेण्यासाठी नगर परिषद प्रशासन आयुक्त तथा संचालक डॉ. किरण कुलकर्णी यांनी बुधवारी (दि. २७) माथेरान नगर परिषदेला भेट दिली.




माथेरान हे जागतिक दर्जाचे पर्यटन असून तेथील पॉईंट, रस्ते यांचे पर्यावरणपूरक सुशोभीकरण करण्यात येत आहे. त्यातील काही कामे सुरू होऊन पूर्ण झाली तर काही प्रस्तावित आहेत. त्यांचा आढावा घेण्यासाठी बुधवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास नगर परिषद प्रशासन आयुक्त डॉ. किरण कुलकर्णी नगर परिषद कार्यालयात आले. त्यावेळी मुख्याधिकारी सुरेखा भणगे-शिंदे व नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी त्यांचे स्वागत केले.

माथेरान नगर परिषदेने उत्पन्नाचे स्त्रोत वाढवले पाहिजेत, हेरिटेज वास्तुमुळे पर्यटकांच्या माध्यमातून नगर परिषदेला उत्पन्न मिळू शकते, असे सांगून डॉ. कुलकर्णी यांनी प्रत्येक विकासकामाचा आढावा घेतला. लेखापाल अंकुश इचके, अभियंता स्वागत बिरंबोळे, स्वच्छता अधिकारी अभिमन्यू एळवंडे, अन्सार महापुळे, अव्वल लिपिक रत्नदीप प्रधान यांच्यासह नगर परिषद कर्मचारी या वेळी उपस्थित होते.

# माणगाव बसस्थानकातील रस्ता होणार चकाचक!

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील बस स्थानकातील खड्डे तातडीने बुजवावेत, या मागणीसाठी माणगाव तालुका भाजपने १ नोव्हेंबरला रास्तारोको आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यानंतर खड्डे बुजवून बसस्थानक आवारातील रस्ता चकाचक करण्याचे आश्वासन आगार प्रमुख देवधर यांनी दिल्याने भाजपचे रास्तारोको आंदोलन तूर्त स्थगित करण्यात आले आहे.

**आगार व्यवस्थापकांच्या आश्वासनानंतर भाजपचे आंदोलन तूर्त स्थगित**

राज्य परिवहन महामंडळाचे माणगाव बस स्थानक खड्ड्यांचे आगार झाले आहे. जागोजागी पडलेले हे खड्डे बुजवून या बस स्थानकातील रस्ता तातडीने दुरूस्त करावा, अन्यथा १ नोव्हेंबरला रास्तारोको करण्याचा इशारा भाजपचे माणगाव तालुका अध्यक्ष संजयआप्पा ढवळे आगार प्रमुखांना निवेदनाद्वारे दिला होता.

दरम्यान, संजयआप्पा ढवळे यांच्यासह भाजपचे तालुका उपाध्यक्ष बाबुराव चव्हाण, सरचिटणीस योगेश सुळे, शहराध्यक्ष राजू मुंढे, संजय जाधव व सहकाऱ्यांनी शुक्रवारी (दि. २९) आगार प्रमुख चेतन देवधर यांची भेट घेऊन त्यांच्याशी माणगाव बस स्थानकांतील खड्ड्यांबाबत चर्चा केली. त्यावेळी पेण येथील विभाग नियंत्रक कार्यालयाकडे निवेदन पाठविण्यात आले असून, तेथील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बोलून माणगाव स्थानकातील खड्डे लवकरच बुजविण्यात येतील, असे आश्वासन आगार प्रमुख देवधर यांनी दिले. त्यामुळे १ नोव्हेंबर रोजी करण्यात येणारे रस्तारोको आंदोलन तूर्त स्थगित करण्यात आले असल्याचे संजयआप्पा ढवळे यांनी प्रसार माध्यमांना सांगितले.

# कर्जत चारफाटा ते श्रद्धा हॉटेल रस्त्याच्या दोन्ही बाजूकडील अतिक्रमण जमीनदोस्त

**कर्जत : प्रतिनिधी**

भिसेगाव परिसरातील चारफाटा ते श्रद्धा हॉटेल (न्यू बिकानेर) या रस्त्याच्या कामात अडथळा ठरणारी अतिक्रमणे कर्जत नगर परिषदेने जमीनदोस्त केली. त्यामुळे बऱ्याच दिवसापासून रखडलेला हा रस्ता लवकरच पूर्ण होईल.

मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असलेला चारफाटा ते श्रद्धा हॉटेल (न्यू बिकानेर) हा रस्ता खूप खराब झाला होता. हा रस्ता व्हावा, अशी भिसेगावमधील नागरिकांची मागणी होती, त्यासाठी त्यांनी उपोषणही केले होते. मात्र तांत्रिक कारणामुळे या रस्त्याचे काम रखडले होते. तांत्रिक अडचण दूर झाल्यानंतर एमएमआरडीएमार्फत कर्जत चारफाटा ते श्रद्धा हॉटेल या रस्त्याच्या कामासाठी सुमारे पाच कोटी रुपयांचा निधी कर्जत नगर परिषदेकडे वर्ग करण्यात आला होता. मात्र या रस्त्याच्या दोन्ही बाजूला अतिक्रमणे असल्याने रस्त्याच्या कामास अडथळा होत होता. नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शहर अभियंता मनीष गायकवाड, नगररचना अभियंता लक्ष्मण माने, बाळा निकाळजे यांनी कर्मचाऱ्या सहकार्याने जमीनदोस्त केली. त्यामुळे आता या रस्त्याचे काम आता जलद गतीने होईल, असे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी सांगितले.

# पालीमध्ये पसरलेय कचऱ्याचे साम्राज्य

## घाण व दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील पालीत कचऱ्याची समस्या गंभीर झाली आहे. नगरपंचायतीच्या घंटागाड्या फिरूनदेखील काही नागरिक फुटक्या कचराकुंड्या आणि रस्त्यावर कचरा टाकत आहेत. रस्त्यावर येणारा हा कचरा नागरिकांच्या आरोग्यास अपायकारक ठरत आहे.

कचराकुंडीत काही खाद्य मिळेल यासाठी गुरे कचऱ्यातील प्लास्टिक पिशव्या खात आहेत, परिणामी गुरांच्या जीवितासही धोका निर्माण झाला आहे. सांडपाण्याचा निचरादेखील योग्य पद्धतीने होत नसल्याने सर्वत्र दुर्गंधी भरुन राहिली आहे.

पालीतील कचरा समस्येवर मात करण्यासाठी तत्कालीन ग्रामपंचायतीतर्फे चार वर्षांपूर्वी घंटागाड्या सुरू करण्यात आल्या होत्या. सध्या नगरपंचायतीकडे चार घंटागाड्या कार्यरत आहेत. फक्त रविवारीच घंटा गाड्या येत नाहीत, त्यानंतर सोमवारी अनेक ठिकाणच्या कचराकुंड्या व रस्त्याच्या कडेला कचऱ्याचा ढीग पडलेला असतो. तर इतर दिवशीदेखील हीच परिस्थिती पहायला मिळते. घंटागाडी कचरा घेऊन गेल्यानंतर झालेला कचरा काही दुकानदार तसेच अनेक नागरिक लागलीच कचराकुंडी व रस्त्यावर फेकतात. यामुळे जागोजागी कचऱ्याचे ढिगार पहायला मिळतात. त्यातून अन्न शोधण्यासाठी भटकी कुत्री व जनावरे जातात आणि हा कचरा रस्त्यावर किंवा बाजुच्या गटारात पडतो. त्यामुळे गटारे तुंबून आणखी समस्या उद्भवते.

**नजीकच्या काळात पालीतील सर्व कचराकुंड्या बंद करणार आहोत. त्यामुळे नागरिकांनी घंटागाडी मध्येच कचरा टाकावा. नागरिकांनी शिस्त पाळण्याची आवश्यकता असून सर्वतोपरी सहकार्य करावे.**

**-दिलीप रायण्णावार, प्रशासक, पाली**

### अपुरे सफाई कर्मचारी

**पाली नगरपंचायतीकडे अधिकृत १५ ते १८ सफाई कर्मचारी आहेत. प्रत्यक्षात जेमतेम ९-१० कर्मचारी रोज कामावर येतात. त्यामुळे त्यांच्यावर अतिरिक्त कामाचा ताण येतो. परिणामी सर्वच ठिकाणची साफसफाई करणे त्यांना शक्य होत नाही.**

### आणखी घंटागाड्या हव्यात

**सध्या कचरा उचलण्यासाठी नगरपंचायतीकडे एक ट्रॅक्टर, दोन छोटा हत्ती घंटा गाड्या व एक ॲपे आहे. यातील एक घंटागाडी छोटी व बंदिस्त आहे. त्यामुळे तिच्यात अधिक कचरा सामावत नाही. तसेच पालीचा विस्तार वाढत असल्याने अधिकच्या घंटागाड्यांची आवश्यकता आहे.**

# महिला शेतकरी दिनानिमित्त गोळेगणी येथे महिलांचा सत्कार

**पोलादपूर : प्रतिनिधी**

कृषीक्षेत्रामध्ये महिलांचे बहुमोल योगदान असल्याने महिला शेतकरी दिनानिमित्त त्यांचा गौरव होणे उचित असल्याचे मत महाड उपविभागीय कृषी अधिकारी बालाजी ताटे यांनी पोलादपूर तालुक्यातील गोळेगणी येथे व्यक्त केले.

महिला शेतकरी दिनानिमित्त गोळेगणी येथे महिला शेतकऱ्यांचा हृद्य सत्कार करण्यात आला, त्यावेळी झालेल्या कार्यक्रमात बालाजी ताटे बोलत होते. या वेळी कृषीपूरक आणि बचतगट माध्यमातून उल्लेखनीय काम केल्याबद्दल प्रांजली पवार, जान्हवी मोरे, उषा मोरे, रेखा येरूणकर, उषा येरूणकर, आश्विनी येरूणकर आणि पूजा मोरे यांचा कृषी कन्या म्हणून गौरव करण्यात आला.

कृषी सहायक मनोज जाधव यांनी प्रास्ताविक केले. तालुका कृषी अधिकारी सूरज पाटील यांनी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया लघुउद्योग योजनेचा लाभ शेतकऱ्यांनी घेण्याचे आवाहन केले. सरपंच नितीन मोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन दरेकर यांनी केले. आत्माचे कपिल पाटील, माजी सरपंच प्रभाकर पवार, तसेच अनिल डासाळकर, महेश कदम, प्रसाद भोकरे, अंजूम मोमीन, कृषीमित्र नामदेव येरूणकर, रोजगारसेवक शेखर येरूणकर, प्रगतशील शेतकरी ज्ञानेश्वर मोरे, सुरेशराव मोरे व प्रकाश मोरे आदी या वेळी उपस्थित होते. कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे यांनी आभार मानले. त्यानंतर बहुपिक पध्दतीने शेती करणारे ज्ञानेश्वर मोरे, दीपक मोरे, अनिकेत मोरे, सागर मोरे, सुरेशराव मोरे यांचा त्यांच्या शेतामध्ये जाऊन सत्कार करण्यात आला.


(छाया : शैलेश पालकर)


Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

**BHAGUBAI CHANGU THAKUR COLLEGE OF LAW, NEW PANVEL**

3 & 5 Years Law Course and 2 Years LL.M. Course

Plot No. 4, Sector 11, Khanda Colony, New Panvel (W), Dist. Raigad, Navi Mumbai - 410206

Requirement For the Academic Year 2021-2022

On Local and Purely Temporary Basis

| SR. | CADRE | L.L.M.SUBJECTS |
|---|---|---|
| 1 | Asst. Professors / on CHB basis to teach to L.L.M. program. | *Criminal Law &Criminal Administration |
| 2 | | *Business Law<br>*Law and Social Transformation in India |
| 3 | | *Indian Constitutional Law, New Challenges |

Qualification Required : *As per University Norms.

•Preference will be given to experienced teachers.

Lectures Days &Time : Wednesday to Saturday - 5PM to 8PM

Last date to apply : 15/11/2021(Send soft copy of the Application & biodata on email bcthakurcollegeoflaw@gmail.com and Hard copy on below mentioned address).

Address: Bhagubai Changu Thakur College of Law, Plot No. 4, Sector 11, Khanda Colony, New Panvel (W),Dist. Raigad, Navi Mumbai - 410206.

For Information : 022-27459185,8850310949,9869230271

Hon'ble Shri. Ramsheth Thakur Ex.M.P. & Chairman

Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel - Raigad

आजचे सामने वर्ल्डकपचा थरार
अफगाणिस्तान वि. नामिबिया (दु ३.३० वा., आबुधाबी)
भारत वि. न्यूझीलंड (सायं ७.३० वा., दुबई)

# आज भारत वि. न्यूझीलंड लढत



**दुबई : वृत्तसंस्था**

ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारताचा दुसरा सामना रविवारी (दि. ३१) न्यूझीलंडविरुद्ध होणार आहे. या सामन्यासाठी भारतीय संघात एकही बदल न होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

पाकिस्तानविरुद्ध २४ ऑक्टोबरला झालेल्या लढतीत भारताला दारुण पराभव पत्करावा लागला. या लढतीत हार्दिकने अवघ्या ११ धावा केल्या तसेच त्याचा उजवा खांदाही दुखावला आहे. आयपीएलच्या १४व्या हंगामातील उत्तरार्धात हार्दिकने एकदाही गोलंदाजी केली नाही. त्यामुळे हार्दिकऐवजी लयीत असलेल्या इशान किशनला संधी द्यावी अथवा अतिरिक्त गोलंदाज खेळवायचा असल्यास शार्दूलला स्थान द्यावे, असे अनेक जाणकारांनी सुचवले, परंतु महेंद्रसिंह धोनीच्या रणनीतीला आदर्श मानून विराट कोहली पाकिस्तानविरुद्ध खेळवलेल्या ११ जणांवरच पुन्हा विश्वास दर्शवण्याची शक्यता आहे.

भारतीय गोलंदाजीत एकालाही यश लाभले नाही. विशेषत: भुवनेश्वर कुमार आणि मोहम्मद शमी यांच्या गोलंदाजीत भेदकताही जाणवली नाही. फलंदाजांनी त्यांच्यावर सहज हल्लाबोल केला. शमीला या कामगिरीमुळे समाजमाध्यमांवर काहींकडून लक्ष्यही करण्यात आले. त्यामुळे शार्दूलला न्यूझीलंडविरुद्ध हमखास स्थान मिळेल, अशी अपेक्षा होती.

शार्दूलने आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्जच्या विजेतेपदात मोलाचे योगदान दिले, तर किशनने सराव सामन्यांत चमकदार कामगिरी केली. फिरकीपटू वरुण चक्रवतीसुद्धा बळी मिळवण्यात अपयशी ठरल्याने त्याच्याऐवजी अनुभवी रविचंद्रन अश्विनला स्थान मिळण्याची शक्यता होती, परंतु सध्या तरी कोणत्याही खेळाडूला गंभीर दुखापत झाल्याशिवाय भारतीय संघात कोणताही बदल होणार नाही, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली.

दरम्यान, अष्टपैलू खेळाडू शार्दुलचा संघात समावेश करण्याच्या प्रश्नावर कर्णधार विराट कोहलीने, तो नेहमीच आमच्या योजनांमध्ये सहभागी असतो. तो एक उत्कृष्ट खेळाडू आहे, असे म्हटले आहे. त्यामुळे अंतिमतः शार्दुला संघात संधी मिळणार की नाही याकडे क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे.

## पाकिस्तानची विजयी हॅट्ट्रिक

### अफगाणिस्तान पराभूत

**दुबई : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वकरंडक स्पर्धेत शुक्रवारी झालेल्या थरारक सामन्यात पाकिस्तानने अफगाणिस्तानला मात दिली. मोक्याच्या क्षणी पाकिस्तानचे प्रमुख फलंदाज बाद झाल्यानंतर अफगाणिस्तान जिंकणार असे वाटत असतानाच आसिफ अलीने वादळी खेळी करीत त्यांचे स्वप्न धुळीस मिळवले.

अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्यात पाकिस्तानला विजयासाठी शेवटच्या दोन षटकांत २४ धावांची गरज होती. पाकिस्तानचे पाच गडी तंबूत परतल्यामुळे आसिफ अली आणि शादाब खान हे नवीन फलंदाज खेळपट्टीवर आले. १९वे षटक जलदगती गोलंदाज करीम जनतने टाकले. न्यूझीलंडविरुद्धच्या मागील सामन्यात १२ चेंडूंत २७ धावा (तीन षटकार, एक चौकार) ठोकलेल्या आसिफ अलीवर सर्वांच्या नजरा होत्या. या सामन्यातही त्याने पहिल्या तिसऱ्या, पाचव्या आणि सहाव्या चेंडूवर षटकार ठोकत दिवाळीपूर्वीच फटाके फोडले.

तत्पूर्वी, सुरुवातीच्या पडझडीनंतर कप्तान मोहम्मद नबी आणि गुलबदिन नैब यांनी केलेल्या नाबाद ७१ धावांच्या भागीदारीच्या जोरावर अफगाणिस्तानने २० षटकांत ६ बाद १४७ धावा केल्या होत्या.

## आरोग्य प्रहर



### जास्त विचार करण्याच्या सवयीमुळे आरोग्याचे नुकसान

आजच्या धावपळीच्या जीवनात प्रत्येकजण तणावाखाली जगत आहे. याचे सर्वांत मोठे कारण म्हणजे अतिविचार. जरी ते त्या व्यक्तीवर अवलंबून आहे की ते कशाला जास्त महत्त्व देतात. काही लोकांना छोट्या छोट्या गोष्टींवर जास्त विचार करण्याची सवय असते, पण आम्ही तुम्हाला सांगतो की, अतिविचार करण्यामुळे आपल्या आरोग्यासाठी खूप नुकसान होऊ शकते. यामुळे तुमचे उर्वरित काम बिघडू शकते आणि जीवनावर वाईट परिणाम होऊ शकतो. या प्रकारच्या सवयीमुळे दीर्घकाळ उदासीनता येते. चला तर मग जाणून घेऊया जास्त विचार करण्याच्या तोट्यांबद्दल.


**नैराश्याचे बळी पडू शकतात –** सतत नकारात्मक विचार केल्याने तुम्हाला काही काळानंतर नैराश्यासारख्या गंभीर मानसिक आजाराला बळी पडू शकते. एखाद्या गोष्टीचा जास्त विचार केल्याने मनातील सकारात्मक ऊर्जा नष्ट होते. त्याची जागा नकारात्मक ऊर्जा घेते. त्यामुळे हळूहळू व्यक्ती मानसिक आजारी बनते. यामुळे तो नैराश्याचा बळी ठरतो. अशा परिस्थितीत प्रयत्न करा की, तुम्ही तुमचे विचार कोणाशी किंवा कोणाशी तरी शेअर केले पाहिजेत.

**एकटेपणाचे बळी होऊ शकतात –** खूप वेळा विचार करण्याच्या सवयीमुळे एखादी व्यक्ती लोकांपासून पळून जाऊ लागते. यामुळे अनेक वेळा तो सामाजिक चिंतेचाही बळी ठरतो. तुम्ही जाणून बुजून लोकांपासून दूर पळू लागता आणि त्यामुळे तुमचा आत्मविश्वास नष्ट होतो.

**वेळ वाया जातो –** जेव्हा आपण एखाद्या गोष्टीचा खूप विचार करतो तेव्हा आपण आपला मौल्यवान वेळ वाया घालवू लागतो. तुमच्या काम करण्याच्या क्षमतेवरही याचा खूप वाईट परिणाम होतो. यामुळे तुम्ही आयुष्यातील अनेक चांगल्या संधींनाही मुकता. तसेच तुमच्या विचारशक्तीवर खूप वाईट परिणाम होतो.

**कामावर वाईट परिणाम –** जास्त विचार करण्याच्या सवयीमुळे तुमच्या कामावरही वाईट परिणाम होतो. हे आपल्या भूक आणि झोपेच्या चक्रावरदेखील परिणाम करते. यामुळे तुमचे नातेही बिघडू शकते. आज जास्त विचार करण्याची सवय सोडण्याचा प्रयत्न करा. जर तुम्हाला जास्त विचार करण्याची सवय असेल तर या टिप्स फॉलो करा. भूतकाळ आठवून दुःखी होऊ नका. स्वतःला व्यस्त ठेवा. सण-उत्सव साजरा करा आणि नकारात्मक लोकांपासून अंतर ठेवा.

## श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यात डिकॉक अखेर गुडघ्यावर बसला



**शारजा : वृत्तसंस्था**

टी-२० वर्ल्डकपमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिला सामना गमवल्यानंतर वेस्ट इंडिजविरुद्धच्या सामना दक्षिण आफ्रिकेसाठी महत्त्वाचा होता, मात्र या सामन्यात क्विंटन डिकॉक प्लेईंग इलेव्हनमध्ये नव्हता. त्यामुळे अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले होते. त्यानंतर ब्लॅक लाईव्ह मॅटर्स अभियानात सहभाग नोंदवणार नसल्याने त्याला वगळण्यात आले होते, पण श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यात पुन्हा एकदा त्याची प्लेईंग इलेव्हनमध्ये वर्णी लागली आहे. विशेष म्हणजे सामन्यात राष्ट्रगीत झाल्यानंतर क्विंटन डिकॉक ब्लॅक लाईव्ह मॅटर अभियानाला पाठिंबा देताना दिसला. गुडघ्यावर बसून त्याने ब्लॅक लाईव्ह मॅटर अभियानाला पाठिंबा दर्शवला.

वेस्ट इंडिजविरुद्धच्या सामन्यापूर्वी दक्षिण आफ्रिका क्रिकेट बोर्डासोबत क्विंटनचा वाद झाला होता. त्यानंतर संघाकडून कधीच खेळणार नाही या बातम्याही समोर आल्या होत्या. हा वाद पेटल्यानंतर डिकॉकने दिलगिरी व्यक्त करीत माफी मागितली. त्यानंतर त्याचे शनिवारी (दि. ३०) संघात पुनरागमन झाले. श्रीलंकेविरुद्ध झालेल्या सुपर-१२ फेरीतील सामन्यात क्लास्सेनच्या जागेवर डीकॉकची प्लेईंग इलेव्हनमध्ये वर्णी लागली.

सामन्याला सुरुवात होण्यापूर्वी क्विंटन डिकॉक गुडघ्यावर बसला. त्यानंतर सोशल मीडियावर मीम्सचा पाऊस पडला. नेटकऱ्यांनी मजेशीर ट्वीट शेअर करीत त्याला खडेबोल सुनावले आहेत.

## क्रिकेटपटू ॲशले मॅलेट यांचे निधन

**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाचे माजी फिरकीपटू ॲशले मॅलेट यांचे वयाच्या ७६व्या वर्षी कर्करोगामुळे निधन झाले. या दक्षिण ऑस्ट्रेलियाच्या फिरकीपटूने शुक्रवारी रात्री ॲडलेडमध्ये अखेरचा श्वास घेतला.

मॅलेट यांनी १२ वर्षांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत एकूण ३८ कसोटी आणि नऊ एकदिवसीय सामने खेळले. त्यांनी १९६८मध्ये इंग्लंडविरुद्ध कसोटी पदार्पण केले आणि या संघाविरुद्ध १९८० मध्ये कारकिर्दीतील शेवटची कसोटी खेळली. त्यांनी कसोटीत २९.८४च्या सरासरीने १३२ बळी घेतले. त्यांनी एकदा १० विकेट्स, सहा वेळा पाच विकेट्स घेण्याचा पराक्रम केला.

मॅलेट यांची गणना जगातील सर्वोत्तम ऑफ-स्पिनर्समध्ये होत असे. १९७२मध्ये पाकिस्तानविरुद्ध ॲडलेड कसोटीच्या एका डावात त्यांनी ५९ धावांत ८ बळी घेतले होते. ऑस्ट्रेलियातील कोणत्याही स्पिनरची ही सर्वोत्तम कामगिरी आहे. मॅलेट यांना त्यांचे सहकारी ‘राउडी’ म्हणत. निवृत्तीनंतर त्यांनी क्रीडा पत्रकार आणि लेखक म्हणूनही काम केले. ते बराच काळ श्रीलंका क्रिकेटचे सल्लागार होते.

### फ्रेंच खुली बॅडमिंटन स्पर्धा

## सिंधूची उपांत्य फेरीत धडक



**पॅरिस : वृत्तसंस्था**

भारताची दुहेरी ऑलिम्पिक पदकविजेत्या पी. व्ही. सिंधूने फ्रेंच खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. युवा खेळाडू लक्ष्य सेन तसेच पुरुष दुहेरीची जोडी सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांचे या स्पर्धेतील आव्हान मात्र संपुष्टात आले. त्यामुळे हा दिवस भारतासाठी संमिश्र ठरला.

महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत सिंधूने आठव्या मानांकित थायलंडच्या बुसानन ओंगबमरुंगपानवर २१-१४, २१-१४ अशी सरळ गेममध्ये मात केली. बुसाननविरुद्ध सिंधूचा हा १५ सामन्यांत १४वा विजय ठरला. त्याआधी गुरुवारी रात्री उशिराने झालेल्या सामन्यात तिने डेन्मार्कच्या लिन ख्रिस्तोफरसनला २१-१९, २१-९ असे पराभूत केले होते. जागतिक क्रमवारीत सातव्या स्थानी असणाऱ्या सिंधूचा उपांत्य फेरीत जपानच्या सयाका ताकाहाशीविरुद्ध सामना होईल.

पुरुष एकेरीतील उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात लक्ष्यला दक्षिण कोरियाच्या हिओ वांगहिकडून १७-२१, १५-२१ असा पराभव पत्करावा लागला. पहिल्या गेममध्ये लक्ष्यने चांगली झुंज दिली, पण दुसऱ्या गेममध्ये त्याचा खेळ खालावला. पुरुष दुहेरीत, मलेशियन जोडी आरोन चाय आणि सोह वूइ यिकने पाचव्या मानांकित सात्विक आणि चिराग जोडीला १८-२१, २१-१८, २१-१७ असे पराभूत केले.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com